# वार्षिक अहवाल

## वरिष्ठ महाविद्यालय

-: संकल्पना :-

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

-: शब्दांकन व मांडणी :-

प्रा. अश्पाक पठाण

## विद्यार्थी मंडळ : (अध्यक्ष : प्रा.डॉ. विजय भगत)

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा व पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार विद्यार्थी मंडळाची स्थापना करण्यात आली. गुणवत्तेनुसार बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. तसेच बी.बी.ए./ बी.सी.ए. /बी.सी.एस. आणि सर्व पद्व्युत्तर विभागांचे वर्ग प्रतिनिधी तसेच एन.सी.सी. प्रतिनिधी राम नेहे, एन.एस.एस. प्रतिनिधी अत्तार चांदसाब, शारीरिक शिक्षण विभागाची प्रतिनिधी ज्योती वैद्य, कला विभागाचा प्रतिनिधी राहुल अव्हाड व मुलींच्या प्रतिनिधी म्हणून मंदा भांगरे व सुवर्णा शिंदे यांची मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत निवड करण्यात आली. या बैठकीत लोकशाही पद्धतीने श्री. प्रशांत आंबरे यांची महाविद्यालयाच्या २०१२-१३ या वर्षासाठी विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

शिवश्री श्रीमंत कोकाटे यांनी विद्यार्थी मंडळाच्या सदस्यांना शपथ देऊन मंडळाचे उद्घाटन केले. या प्रसंगी कोकाटे यांनी 'शिवछत्रपती शिवाजी महाराज आणि युवक' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.डी.के. सहाणे, सहसेक्रेटरी अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला.

शहीद दिनानिमित्त महाविद्यालयात 'शहीद स्मृती अभिवादन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.जे.डी. आंबरे पाटील, प्राचार्य रमेशचंद्र खांडगे व विद्यापीठ प्रतिनिधी प्रशांत आंबरे यांनी स्तंभास पुष्पचक्र अर्पण केले.

विरेंद्र मेढे, रविंद्र कोल्हाळ, तौफिक शेख आणि दिनेश शिंदे या विद्यार्थ्यांनी क्रांतिज्योती माय सावित्री यांच्या जयंतीनिमित्त 'स्त्री पुरूष समानता' प्रदर्शित करणाऱ्या भित्तिपत्रकांचे प्रदर्शन भरविले. विद्यापीठ प्रतिनिधी प्रशांत आंबरे याने ही संकल्पना मांडली तर डॉ. विजय भगत यांनी मार्गदर्शन केले.

स्नेहसम्मेलनानिमित्त महाविदयालयात विद्यार्थी मंडळाच्या वतीने सारी व टाय डे, कॅप डे, ट्रॅडिशनल डे आणि व्हाईट डे सादर करण्यात आले. तसेच स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

वर्षभर मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, प्रा. अशोक दातीर, प्रा. भानुदास शिंदे, प्रा. यासिन सय्यद, प्रा. नंदलाल काळण यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

* * *

## विद्यार्थी कल्याण मंडळ - (अध्यक्ष : प्रा. अशोक दातीर)

विद्यार्थी कल्याण मंडळाने २०१२-१३ या शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम राबविले.

१) 'कमवा व शिका योजना' महाविद्यालयात राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत एकूण १११ विद्यार्थी या योजनेचा लाभ घेत आहे. या योजनेमध्ये प्रा. बी. के. भांगरे, प्रा. वाघमारे, प्रा.डॉ. शेडगे, प्रा. खताळ, प्रा.डॉ. खेमनर यांचा सहभाग व सहकार्य लाभत आहे.

२) विद्यार्थी कल्याण मंडळाने 'विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ' यांचे सहकार्याने दि. २७ व २८ डिसेंबर २०१२ हे दोन दिवस विभागीय आपत्ती व्यवस्थापन शिबीर राबविले. यामध्ये एकूण १३१ विद्यार्थी सहभागी झाले. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीतील व्यवस्थापन, आग, पूर, पाणी, त्सुनामी, भुकंप यासारख्या आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापनासंदर्भात प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच सर्पांविषयीचे ज्ञान, सर्पदंशानंतरचे प्रथमोपचार, स्ट्रेचर बनविणे इत्यादीचे प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी मा.श्री. राजेंद्र रहाणे, प्रा. मधुसूदन दिवेकर यांची व्याख्याने झाली. श्री. विजय पवार, श्री. अमित गायकवाड, आपत्कालीन व्यवस्थापन कक्ष व आपल्या महाविद्यालयातील 'राष्ट्रीय सेवा योजना' यांचे सहकार्य लाभले.

३)	विद्यार्थीनींना किमान स्वतःचे संरक्षण स्वतः करता आले पाहिजे यासाठी 'निर्भय कन्या अभियानाद्वारे' स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. निर्भय कन्या अभियान, विद्यार्थी कल्याण मंडळ पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने राबविण्यात आले. प्रा.सौ. महेजबीन सय्यद, प्रा.सौ. रंजना कदम, प्रा.डॉ.सौ. अकिला शेख यांचे या अभियानासाठी सहकार्य लाभले तसेच अकोले पंचायत समिती, अकोलेच्या सभापती श्रीमती अंजनाताई बोंबले व ॲड.सौ. मंगलाताई हांडे यांचे मार्गदर्शन लाभले. कराटे प्रशिक्षक श्री. सुभाष मेंढे यांनी कराटे प्रशिक्षणाद्वारे सहभागी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले. या अभियानामध्ये २०० पेक्षा अधिक विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

४)	या मंडळाने विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन योजना व विद्यार्थिनींसाठी 'विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास' योजना यशस्वीपणे राबविली.

५)	संगमनेर महाविद्यालयामध्ये झालेल्या विभागीय युथ फेस्टीवल स्पर्धेत विद्यार्थिनींनी भाग घेतला.

६)	राजूर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरामध्ये ४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

७)	राजूर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या दोन दिवसीय जिल्हास्तरीय गिर्यारोहन व गिरिभ्रमण शिबीरामध्ये ८ (आठ) विद्यार्थ्यांचा सहभाग. तसेच विद्यापीठ स्तरीय साहस शिबीरामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग उल्लेखनिय आहे.

८)	राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन घोषवाक्य स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

९)	विद्यार्थी शिक्षणापासून आर्थिक अडचणींमुळे वंचित राहू नये, म्हणून ज्या विद्यार्थ्यांना कोणतीही सवलत मिळत नाही अशा गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पुणे विद्यापीठामार्फत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यासाठी

अ)	क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले अर्थसहाय्य योजना व

ब)	आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य या योजनांतर्गत विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठास पाठविले व अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी मदत करण्यात आली.

या सर्व योजनांसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभत आहे.

* * *

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग - (प्रा. नंदलाल काळण)

सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात विविध खेळांचे संघ तयार करून आंतर-महाविद्यालयीन, आंतर-विभागीय तसेच राज्यस्तरीय स्पर्धांसाठी पाठविण्यात आले.

*** बध्दीबळ :**

आंतर-महाविद्यालयीन बुद्धीबळ स्पर्धा सप्तक भवन, अहमदनगर येथे दि. ६ व ७ ऑगस्ट २०१२ रोजी पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे ४ खेळाडू सहभागी झाले.

*** रोपमल्लखांब :**

आंतर-महाविद्यालयीन रोप मल्लखांब स्पर्धा पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, लोणी येथिल स्पर्धेत कु. ज्योती कैलास वैद्य हिने प्रथम क्रमांक मिळविला. तिची पुणे विभागीय स्पर्धेसाठी अ. नगर विभागातर्फे निवड करण्यात आली.

*** हॅन्डबॉल (मुले) :**

आंतर-महाविद्यालयीन हॅन्डबॉल स्पर्धा ॲड. मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजूर येथे दि. २४ व २५ सप्टेंबर २०१२ रोजी पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला. संघातील खेळाडू -

आंतर महाविद्यालयीन स्पर्धेतून आंतर विभागीय स्पर्धेसाठी अ. नगर विभागातर्फे पुणे विभागीय स्पर्धेसाठी

१) परदेशी हेमंत विजय

२) मेढे विरेंद्र संपत यांची निवड झाली

आंतर विभागीय स्पर्धा आण्णासाहेब वाघिरे कॉलेज, ओतूर येथे दि. ५ व ६ ऑक्टोबर २०१२ रोजी पार पडल्या. यात आपले खेळाडू सहभागी झाले.

** महाराष्ट्र हॅन्डबॉल असोसिएशनच्या वतीने हडपसर, पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी अ.नगर जिल्हा हॅन्डबॉल असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा हॅन्डबॉल निवड चाचणी स्पर्धेतून आपल्या महाविद्यालयाच्या चार खेळाडूंची राज्यस्तरीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी अ.नगर जिल्हा संघात निवड झाली.

राज्यस्तरीय हॅन्डबॉल स्पर्धा दि. २२ ते २४ डिसेंबर २०१२ रोजी हडपसर, पुणे येथे पार पडल्या यामध्ये आपले खेळाडू सहभागी झाले.

*** हॅन्डबॉल (मुली) :**

आंतर-महविद्यालयीन हॅन्डबॉल स्पर्धा ॲड. मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजूर येथे दि. २६ सप्टेंबर २०१२ रोजी पार पडल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकाविले.

अ.नगर विभागातर्फे पुणे विभागीय हॅन्डबॉल स्पर्धेसाठी पुढील खेळाडूंची निवड झाली.

* आंतर-विभागीय हॅन्डबॉल स्पर्धा आण्णासाहेब वाघिरे कॉलेज, ओतूर येथे दि. ६ व ७ ऑक्टोबर २०१२ रोजी पार पडल्या. यामध्ये आपल्या खेळाडू सहभागी झाल्या.

*** कुस्ती :**

आंतर-महाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा एस.जे. एस. कॉलेज, श्रीगोंदा येथे दि. २२ व २३ ऑक्टोबर २०१२ रोजी पार पडल्या. यामध्ये सदगीर लहानू निवृत्ती हा कुस्तीपटु सहभागी झाला.

*** क्रिकेट :**

आंतर-महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा लोणी येथे दि. १३ व १४ सप्टेंबर २०१२ रोजी पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा पुढील संघ सहभागी झाला होता.

*** ॲथलेटीक्स : मैदानी स्पर्धा**

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे दि. २५ व २६ ऑक्टोबर २०१२ रोजी पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे पुढील खेळाडू सहभागी झाले.

आंतर-महाविद्यालयीन स्पर्धेत १०,००० मीटर धावणे मध्ये

* पोपेरे गोरक्षनाथ पुंजा याचा तृतीय क्रमांक आला.

*** नेटबॉल (मुले) :**

आंतर महाविद्यालयीन नेटबॉल स्पर्धा दि. ११ व १२ डिसेंबर २०१२ रोजी इंजिनिअरींग कॉलेज, राहूरी येथे पाठविण्यात आला

* आंतर-महाविद्यालयीन स्पर्धेतून आपल्या महाविद्यालयाच्या तीन खेळाडूंची आंतर विभगीय स्पर्धेसाठी निवड झाली. -

  १) भळगट पुष्पक अशोक  २) शेख तोफिक अरिफ

  ३) मेंगाळ धनंजय रामचंद्र

* आंतर विभागीय नेटबॉल स्पर्धा कला, वाणिज्य महाविद्यालय, चाकण येथील स्पर्धेत खेळाडूंचा सहभाग.

* महाराष्ट्र नेटबॉल असोशिएशनच्या वतीने राजगुरूनगर, पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धेसाठी

अ.नगर जिल्हा नेटबॉल असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा निवड चाचणी स्पर्धेतून अ.नगर जिल्हा संघात आपल्या महाविद्यालयाच्या शेख तोफिक अरिफ या खेळाडूची निवड झाली.

* राज्यस्तरीय नेटबॉल स्पर्धेत शेख तोफिक अरिफ हा खेळाडू सहभागी झाला.

*** नेटबॉल (मुली) :**

आंतर-महाविद्यालयीन नेटबॉल स्पर्धा महाविद्यालयाच्या मैदानावर दि. १३ डिसेंबर २०१२ रोजी पार पडल्या. या स्पर्धेतून आपल्या महाविद्यालयाच्या सात खेळाडूंची आंतर विभागीय स्पर्धेसाठी अ.नगर जिल्हा संघात निवड झाली -

आंतर विभागीय नेटबॉल स्पर्धा पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, मालेगांव कॅम्प येथे दि. १७ व १८ डिसेंबर २०१२ रोजी पार पडल्या. यात आपल्या खेळाडू सहभागी झाल्या.

*** टग ऑफ वार (रस्सीखेच) :**

महाराष्ट्र टग ऑफ वार असोशिएशनच्या वतीने राज्यस्तरीय टग ऑफ वार अजिंक्यपद स्पर्धा शारीरिक शिक्षण महाविद्यालय, नांदेड येथे दि. १६ ते १८ जून २०१२ रोजी पार पडल्या. या स्पर्धेसाठी अ.नगर जिल्हा संघात आपल्या महाविद्यालयाच्या

१) पवार अजित रमेश

२) शेख खालिद दिलावर यांची निवड झाली.

हे खेळाडू नांदेड येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी झाले होते.

*** वार्षिक क्रीडा स्पर्धा :**

सालाबादप्रमाणे याहीवर्षी वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

क्रीडा विभागाचे कामकाज करीत असताना वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, उपप्राचार्य प्रा. आत्माराम काळे, पर्यवेक्षक प्रा. एस. टी. चासकर, क्रीडा विभाग समिती सदस्य, सर्व प्राध्यापक वर्ग, महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच गावातील अनेक सेवाभावी संस्था, व्यक्ती यांनी वेळोवेळी सहकार्य केले या सर्वांचा क्रीडा विभाग सदैव ऋणी राहील.

* * *

## राष्ट्रीय छात्र सेना (एन्.सी.सी.)

**मेजर प्रा. भानुदास शिंदे** (ANO : Associate NCC Officer.)

'NATION FIRST' आणि 'UNITY AND DISCIPLINE' या ध्येयाने प्रेरित तरूण विद्यार्थी एन.सी.सी. त प्रवेश घेतात. आज या सारख्या संस्था व चळवळीची नितांत गरज आहे. या शैक्षणिक वर्षात एकूण ५३ विद्यार्थ्यांना एन.सी.सी.त प्रवेश देण्यात आला.

*** नियुक्ती/नेमणूक** : २०१२-१३ या वर्षाकरिता प्रशिक्षण कॅम्प व विविध प्रशिक्षण उपक्रमात नेतृत्व करण्यासाठी खालील कॅडेट्सची नेमणूक करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १. अंडर ऑफिसर | - | U/o राम बाजीराव नेहे |
| २. विद्यार्थी मंडळ प्रतिनीधी | - | SUO राम नेहे |
| ३. सार्जंट | - | Sgt भुजबळ सुरज मोहन |
| ४. सार्जंट | - | Sgt लांडे सुदर्शन नामदेव |

*** राष्ट्रीय ध्वजारोहण समारंभ :**

स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनी सालाबादप्रमाणे मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले.

तसेच २६/११ ला शहीद झालेल्या सेनादलातील व पोलीस दलातील अधिकारी यांच्या स्मरणार्थ बांधलेल्या शहीद स्मारकावर मा.जे.डी.आंबरे पाटील व मा. प्राचार्य यांच्या हस्ते पुष्पचक्र वाहण्यात आले. एन.सी.सी. छात्रांनी मानवंदना दिली.

*** 'B' आणि 'C' प्रमाणपत्र परीक्षा :**

'C' प्रमाणपत्र परीक्षा पास होणाऱ्या कॅडेटस् ना भारतीय सेना दलात भरती होण्याची संधी प्राप्त होते. त्यांना मदतीसाठी होणाऱ्या लेखी परीक्षेतून सुट मिळते. यावर्षी 'C' प्रमाणपत्र परीक्षेसाठी १५ व 'B' प्रमाणपत्र परीक्षेसाठी २५ छात्र पात्र ठरले आहेत.

**विविध कॅम्प - प्रशिक्षण व सहभाग :**

अ) **ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प, कृषि विद्यापीठ राहुरी (थलसेना) :** २२ मे ते ३१ मे २०१२ पर्यंत घेण्यात आला. बेसिक प्रशिक्षण फायलिंग, अडथळा शर्यत, नकाशा वाचन इ. चे ट्रेनिंग व स्पर्धा घेण्यात आल्या. या कॅम्पमध्ये ०९ छात्र सहभागी झाले.

ब) **GSC: ग्रुप कलेक्शन कॅम्प औरंगाबाद :** ३० जून ते ०९ जुलै पर्यंत घेण्यात आला त्यात अंडर ऑफिसर राम नेहे, Sgt भुजबळ सुरज, Sgt भांगरे प्रभंजन, Sgt लांडे सुदर्शन यांचा सहभाग होता.

क) **ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प :** (RDC) **सिलेक्शन कॅम्प :** अहमदनगर येथे दि. ३ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०१२ पर्यंत घेण्यात आला. RDC साठी या कॅम्पमध्ये Sgt भांगरे प्रभंजन, Sgt भुजबळ सुरज, वाजे प्रमोद, Sgt बिन्नर विलास यांची पुढील कॅम्पसाठी निवड झाली. एकूण १५ छात्रांनी भाग घेतला.

ड) **स्पेशल ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प (RDC) रिपब्लिक डे कॅम्प :** औरंगाबाद येथे दि. २५ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबर २०१२ पर्यंत घेण्यात आला. एकुण ११ छात्रांनी भाग घेऊन प्रशिक्षण पूर्ण केले. SUO सिनीयर अंडर ऑफिसर राम नेहे यांनी औरंगाबाद ग्रुप RDC कॅन्टीनजन्टचे नेतृत्व केले त्याची SUO म्हणून निवड झालेली होती.

इ) **ग्रुप सिलेक्शन कॅम्प** II (स्पेशल) : औरंगाबाद येथे दि. ०६ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर २०१२ पर्यंत घेण्यात आला. या कॅम्पमध्ये आपल्या १० छात्र सैनिकांनी भाग घेऊन प्रशिक्षण पूर्ण केले.

ई) **AAC आरमी ॲटचमेंट कॅम्प : MIRC** अहमदनगर येथे दि. ०१ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०१२ पर्यंत घेण्यात आला. सदर कॅम्पमध्ये रेगुलर आरमी सोबत आपल्या युनिट मधील खालील छात्रांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

१. Sgt भुजबळ सुरज मोहन
२. Sgt लांडे सुदर्शन नामदेव
३. CPL कातोरे अभिजीत बाळासाहेब
४. CPL नाईकवाडी सचिन सुर्यभान

उ) **CATCI व ATC स्पेशल कॅम्प :**

महाराष्ट्र स्तरावरील RDC साठी निवडलेले कॅडेटचे प्रशिक्षणासाठी २० छात्र आपल्या युनिटमधून सहभागी झाले. सदर कॅम्पमध्ये राम नेहे याची RDC साठी महाराष्ट्र इन्टीनजन्ट मध्ये निवड झाली. सदर कॅम्प दि. २९ नोव्हेंबर ते ०८ डिसेंबर २०१२ पर्यंत झाला.

ऊ) **रि-पब्लीक डे कॅम्प दिल्ली :** (RDC Delhi)

गॅरिसन परेड ग्राऊंड दिल्ली येथे दि. २८ डिसेंबर ते ०८ फेब्रुवारी २०१३ पर्यंत सदर कॅम्प अखिल भारतीय स्तरावर घेण्यात

येतो. SUO नेहे राम बाजिराव याची महाराष्ट्र कॅन्टीजेन्टमध्ये निवड होऊ न तो या कॅम्पमध्ये प्रशिक्षण घेत आहे. तसेच SUO राम नेहे यांची २६ जानेवारी २०१३ साठी राजपथावरील संचलन परेडसाठी निवड झालेली आहे. आपल्या एन.सी.सी. युनिटसाठी ही बाब अभिमानास्पद आणि प्रेरणादायी अशी आहे. त्यास ब्रिगेडीयर ठोबळे ग्रुप कमांडर औरंगाबाद आफिसर कमांडर कर्नल देशपांडे अहमदनगर, ले. कर्नल बशिर अहमद प्रशान अधिकारी अहमदनगर ५७ बटालीयन, मेजर बी.आर.शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले.

* **भारतीय सेना दलात दाखल :** आपल्या महाविद्यालयातील खालील एन.सी.सी. छात्र सेना दलात या शैक्षणिक वर्षात भरती झाले आहेत. त्यांनी विद्यार्थी व छात्रांसाठी एक आदर्श निर्माण केला आहे.

कॅडेट टेमगिरे राहूल (सिगनल रेजिमेंट)

कॅडेट कुमकर निलेश (बी.एस.एफ)

कॅडेट जाधव निलेश (बी.एस.एफ)

कॅडेट झोडगे किरण (मराठा लाईट इन्फन्ट्री)

कॅडेट भुजबळ किरण (मराठा ला. इन्फन्ट्री)

वरील सर्व छात्र सैनिकांचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांनी अभिनंदन केले आहे.

* * *

## राष्ट्रीय सेवा योजना (एन्. एस्. एस्.) -

### (कार्यक्रम अधिकारी : प्रा. यासीन सय्यद)

"जहाजों को जो डुबा दे
उसे तूफान कहेते हैं,
तूफानों से जो टक्कर ले
उसे एन.एस.एस. के नौजवान कहते हैं '

आजच्या या स्वार्थमय जगात पदोपदी मोठे-मोठे तुफान उभे करणाऱ्या वाईट प्रवृत्तींना टक्कर देण्याचे सामर्थ्य राष्ट्रीय सेवा योजना देते. 'जीवन म्हणजे संघर्ष' हे राष्ट्रीय सेवा योजनेतून शिकावयास मिळते.

'अहंकार टाका.' हे राष्ट्रीय सेवा योजना शिकवते. महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास घडून आणून त्याच्यामध्ये सामाजिक भान निर्माण करून सामाजिक विकासामध्ये त्यांना सहभागी करून घेण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करते. तसेच तरुणांमध्ये नेतृत्त्वगुण साहित्यगुण, सांघिक व खिलाडूवृत्ती निर्माण करणे. त्यांच्यामध्ये दडलेल्या सुप्तगुणांचा शोध घेऊन सर्वगुणसंपन्न युवक तयार करणे राष्ट्रासाठी सुदृढ युवक तयार करणे. त्यासाठी योग्य व पोषक वातावरण निर्माण करणे. खेड्यातील निसर्ग साधनसंपत्ती, ऐतिहासिक परंपरा, संस्कृती, जैवविविधता यांचा सुयोग्य वापर करून ग्रामीण व शहरी भागाचा विकास करणे. विविध समस्यांचे सर्वेक्षण करून त्यांचे विश्लेषण करणे, त्यांचा अहवाल तयार करणे. त्या अधारे समाज व शासनाला निर्णय धोरण प्रक्रियेत याचा उपयोग करता येईल. याद्वारे समाजातील दरी कमी होईल. 'राष्ट्रीय सेवा योजना' हा महाविद्यालयीन युवक आणि समाज व खेडे यांना जोडणारा दुवा आहे.

**अ) उद्घाटन व नियमित कार्यक्रम -**

१) दिनांक १ ऑगस्ट २०१२ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. यासीन सय्यद यांच्या हस्ते नियमित कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे ३०० स्वयंसेवक एकक असून त्यात मुले १९६ व मुली १०४ आहेत.

२) दि. ९ ऑगस्ट २०१२ रोजी लोकपंचायत संगमनेर आयोजित ''हमारा बिज, हमारा अभियान'' या विषयावर मा.श्री. विजय सांबरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

३) राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा उद्बोधनवर्ग घेण्यात आला यात कार्यक्रम अधिकारी प्रा. यासीन सय्यद यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

४) प्रा. यासीन सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत 'आपत्ती व्यवस्थापन कक्ष' स्थापन करण्यात आला.

५) ''सर्प-समज, गैरसमज'' या विषयावर सर्प मित्र अमित गायकवाड, अमित वैद्य, वैभव काशिद, महेश तुपसुंदर, विशाल वैराट, कृष्णा जगदाळे यांचे सहप्रयोग व्याख्यान झाले.

६) कळसुबाई येथे ट्रेकिंग कॅम्प आयोजित करण्यात आला. यामध्ये ३२ मुले १३ मुली असे एकूण ४५ स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले.

७) दि. २४ सप्टेंबर २०१२ राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिनानिमित्त मा.डॉ.मुकूंद डांगे-अंभोरे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

८) गणेश विसर्जनाच्या वेळी प्रवरा नदीवर गणेश मूर्ती व निर्माल्यदान स्टॉल उभारून १३२६ गणेश मूर्तिदान व निर्माल्यदान राष्ट्रीय सेव योजनेच्या स्वयंसेवकांनी जमा केले व त्यांचे विधीपूर्वक विसर्जन केले.

या निर्माल्याचा उपयोग गांडुळखतासाठी केला. या कामी अकोले पोलिस स्टेशनचे पी.आय. शेळके साहेब, पी.एस.आय. बेंद्रे साहेब व पो. कॉन्स्टेबल नितीनदादा सोनवणे यांनी सहकार्य केले.

९) २ ऑक्टोबर २०१२ रोजी 'महात्मा गांधी जयंती' साजरी करण्यात आली या वेळी कार्यक्रम अधिकारी प्रा. यासीन सय्यद यांनी महात्मा गांधींचे विचार स्वयंसेवकांना सांगितले त्यानंतर महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करण्यात आला. स्वयंसेवकांनी स्त्रीभ्रूणहत्या पथनाट्य सादर केली.

१२) दि. १ डिसेंबर २०१२ जागतिक एड्स जनजागृती दिनानिमित्त स्वयंसेवकांनी पोस्टर प्रदर्शन केले व रॅली काढण्यात आली. या वेळी प्रा. केशवराव नाईकवाडी यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

१३) दिनांक २ जानेवारी २०१३ रोजी अर्पण ब्लड बँक संगमनेर व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले. या वेळी स्वयंसेवकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून ६० पिशवी रक्तदान केले.

**ब) राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचा सहभाग -**

* राज्यस्तरिय हरितग्राम व शाश्वत ग्राम विकास तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती, जि. पुणे येथे सहभागी स्वयंसेवक.

  अ) अत्तार मुजम्मिल चांदसाब (एस.वाय.बी.ए.)

  ब) लोटे अलका चिंधू (टी.वाय.बी.ए.)

* राज्यस्तरीय श्रमसंस्कार व व्यक्तिमत्त्व विकास शिबीर सोमनाथ आनंदवन, जि. चंद्रपूर येथे सहभागी स्वयंसेवक

  अ) अत्तार मुजम्मिल चांदसाब (एस.वाय.बी.ए.)

  ब) गोडे सीताबाई जगन्नाथ (टी.वाय.बी.ए.)

  क) वघेल पुजा कच्छेद्री (एस.वाय.बी.बी.ए.)

* राज्यस्तरीय आव्हान आपत्ती व्यवस्थापन शिबीर महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे सहभागी स्वयंसेवक.

  अ) अत्तार मुजम्मिल चांदसाब (एस.वाय.बी.ए.)

ब) गोडे सीताबाई जगन्नाथ (टी.वाय.बी.ए.)

क) जगदाळे कृष्णा राजेंद्र (टी.वाय.बी.ए.)

* राज्यस्तरीय पुणे ते पंढरपूर हरित उर्जा दिंडीसाठी सहभागी स्वयंसेवक

अ) पुंडे प्रविण भाऊसाहेब (टी.वाय.बी.एस्सी)

ब) वघेल पुजा कच्छेद्री (एस.वाय.बी.बी.ए.)

* बी.एस.टी. कॉलेज संगमनेर येथे एन.आर.डी. व एस.आर.डी निवड चाचणीसाठी सहभागी स्वयंसेवक

अ) शेटे वैभव भरत (एस.वाय.बी.ए.)

ब) पिंगळे नवनाथ कारभारी (एस.वाय.बी.ए.)

* पुणे विद्यापीठ पुणे येथे एन.आर.डी. साठी सहभागी स्वयंसेवक

अ) शेटे वैभव भरत (एस.वाय.बी.ए.)

* उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव येथे एन.आर.डी साठी सहभागी स्वयंसेवक

अ) शेटे वैभव भरत (एस.वाय.बी.ए.)

* विद्यापीठस्तरीय-दंडकारण्य अभियान विद्यापीठ स्तरीय शिबीर खांडगांव, तां. संगमनेर येथे १८ स्वयंसेवकांचा सहभाग.

* उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव येथे एन.आर.डी. साठी

अ) शेटे वैभव भरत (एस.वाय.बी.ए.) यांचा सहभाग.

**क) विशेष हिवाळी शिबीर २०१२-१३** (वार्षिक अहवाल)

मौजे निंब्रळ येथे विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५२ मुली व ९८ मुले अशा एकूण १५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. या शिबिरात ६५० मीटर सलग समपातळी चर (सी.सी.टी.) वृक्षारोपणासाठी १२००० खड्डे खोदण्यात आले. याशिवाय मंदिरे, शाळा, आंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामीण रुग्णालय, स्वस्त धान्य दुकान परिसर स्वच्छ करण्यात आला. त्याचबरोबर स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी पथनाट्य, रॅली जनजागृती इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण कामे करण्यात आली. तसेच शाश्वत व सर्वांगीण ग्रामविकास, उर्जाबचत, आर्थिक सर्वेक्षण, माती परीक्षण, आरोग्य शिबीर, जैवविविधता, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, सर्प : समज-गैरसमज सहप्रयोग व्याख्यान इत्यादी उपक्रम हाती घेण्यात आले.

सदर कामाचे अंदाजे मूल्य १,७५,००० रु. इतके आहे.

दि. १५ डिसेंबर २०१२ रोजी अ.ता.ए.सोसायटीचे सेक्रेटरी मा.श्री. यशवंतराव आभाळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन समारंभ संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे अकोले पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.श्री. उत्तमराव शेळके साहेब तसेच पोलीस कॉन्स्टेबल मा.श्री. नितीनदादा सोनवणे साहेब तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे सर यांच्या उपस्थितीत उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या वेळी निंब्रळ गावच्या सरपंच सौ. सीताबाई पथवे व उपसरपंच श्री. गंगाधर नलावडे, ग्रामपंचायत सदस्य श्री. भाऊसाहेब तिटमे, ग्रामपंचायत कर्मचारी श्री. दिपक वंडेकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

शिबीर कालावधीमध्ये योगी डॉ. अजीतकुमार जगताप यांचे 'निसर्गोपचार : एक जीवनशैली' या विषयावर व्याख्यान झाले. या वेळी मा.डॉ.डी.के. सहाणे, अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. मा.प्रा. बाबा खरात यांचे 'लोकरंजनातून लोकशिक्षण' या विषयावर मार्गदर्शन झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष, अ.ता.ए.सोसायटीचे खजिनदार मा.ॲड.के.बी. हांडे साहेब होते. तसेच संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य के.के. देशमुख यांनी 'मातीपरीक्षण : आधुनिक शेतीची गुरूकिल्ली' या विषयावर स्वयंसेवकांना

मार्गदर्शन केले. मा.सौ. वृषालीताई गायकवाड यांचे 'स्त्री-भ्रूणहत्या' या विषयावर मार्गदर्शन लाभले. मा.प्रा.डॉ. राहुल हांडे यांचे 'युवकः समस्या आणि प्रेरणा' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी कार्यक्रमांचे अध्यक्ष एम.बी.ए./एम.सी.ए. कॉलेजचे ग्रंथपाल प्रा. प्रविण आंबेकर उपस्थित होते. त्यानंतर विजय पवार व सहकारी यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण स्वयंसेवकांना दिले.

विशेष हिवाळी शिबिराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुण्या मा.श्रीमती अंजनाताई बोंबले, सभापती पंचायत समिती, अकोले, अध्यक्ष- अ.ता.ए.सोसायटीचे अध्यक्ष मा.श्री.जे.डी. आंबरे पाटील, अ.ता.ए.सोसायटीचे सेक्रेटरी मा.श्री. यशवंतराव आभाळे साहेब, विस्तार प्रमुख मा.श्री. मीनानाथजी पांडे साहेब, अगस्ति सहकारी साखर कारखान्याचे संचालक मा.श्री. राजेंद्र डावरे, निंब्रळ गावचे उपसरपंच गंगाधर नलावडे, निंब्रळ गावचे ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब तिटमे, संतोष खोंड, अरुण वंडेकर, अरुण गायकर, दिपक वंडेकर, एकनाथ शिंदे, जीवदया प्रतिष्ठानचे सचिव विठ्ठल वंडेकर, प्रा. प्रविण आंबेकर, जि.प.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक गोडसे सर, भांगरे सर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

शिबिरादरम्यान सर्प समज-गैरसमज यावर सहप्रयोग सर्पमित्र अमितकुमार गायकवाड, महेश तुपसुंदर, विशाल वैराट यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. चांदसाब (राजू) अत्तार यांनी विनोदी अभिनय स्वयंसेवकांसमोर साकारला तसेच मुकुंदा भोर यांचे शिवचरित्रावर व्याख्यान झाले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. यासीन सय्यद, सहकार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रा.सौ. महेजबीन सय्यद, प्रा. भानुदास खताळ, प्रा.कु. अमृता कानवडे, प्रा.कु. कांचन कातोरे, श्री. बाळासाहेब अस्वले, श्री. वसंत जेडगुले, विद्यापीठ प्रतिनिधी प्रशांत आंबरे, रा.से.यो. विद्यार्थी प्रतिनिधी मुज्जमील अत्तार, रा.से.यो. विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. अनुजा बाभाळे, आपत्ती व्यवस्थापन कक्ष प्रमुख विजय पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

शिबिरामध्ये दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी अंबिका माता ग्रुप (भांगरे प्राजक्ता भरत), शिवनेरी ग्रुप (सय्यद आयेशा इम्रान) राणी लक्ष्मीबाई ग्रुप (आभाळे अनुजा अरुण), सत्यमेव जयते ग्रुप (कदम सम्राट अशोक), छत्रपती शिवाजी महाराज ग्रुप (पोपेरे गोरक्षनाथ पुंजा) प्रवरा ग्रुप (घनकुटे वनिता काशिनाथ) तसेच सदिच्छा भेट देणारे महाविद्यालयाचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, कार्यालयीन अधीक्षक चंद्रभान ढवळे, चतुर्थश्रेणी कर्मचारी, सर्व हितचिंतक, रा.से.यो.चे माजी विद्यार्थी, सर्व शिबिरार्थी स्वयंसेवक तसेच निंब्रळ गावचे सर्व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**ड) युवा सप्ताह -**

'युवा सप्ताहात' निबंध, वाद-विवाद, गायन, हस्ताक्षर, अभिनय इ. स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

* * *

## यु.जी.सी. - (समन्वयक : प्रा. बाळासाहेब मेहेत्रे)

यु.जी.सी.च्या ११ व्या योजनेतुन महाविद्यालयास "Financial assistance to college, Undf the schemen of Providing Additional Assiatance to college" या स्किममधून ५० लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. यापैकी २० लाख रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. या अनुदानातून महाविद्यालयातील विविध विज्ञान विभागांसाठी शैक्षणिक उपकरणे, संगणक, प्रयोगशाळा साहित्य, जनरेटर, फॅक्स मशिन, झेरॉक्स मशिन, वातानुकुलीत यंत्रणा आदि साहित्य खरेदीसाठी हे अनुदान मंजूर झाले आहे. महाविद्यालयाने याबाबतचा प्रस्ताव युजीसीला सादर केला होता.

सदर कामी प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे मार्गदर्शन व प्रा. एस. के. मालुंजकर, प्रा. के. बी. नाईकवाडी, प्रा. डॉ. एस. एम. सोनवणे, श्री. सी. आर. ढवळे यांचे सहकार्य लाभले.

* * *

## परीक्षा विभाग - (महाविद्यालय परीक्षा अधिकारी प्रा. के. बी. नाईकवाडी)

पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयाची सत्रांत परीक्षा नोव्हेंबर ते डिसेंबर २०१२ मध्ये घेण्यात आली. ऑक्टोबर २०१२ मध्ये झालेल्या प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान, बी.सी.ए., बी.बी.ए. व बी.सी.एस. या वर्गाच्या परीक्षा झाल्यावर विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्या नियमानुसार सेंट्रल ॲसेसमेंट प्रोग्राम महाविद्यालयात परीक्षा समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला व वरील सर्व वर्गांचे निकालही विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या वेळेत जाहीर करण्यात आले.

वरील सर्व परीक्षा पार पाडण्यासाठी परीक्षा विभागाचे सदस्य प्रा. एस. एस. गायकवाड, डॉ. एस. एम. सोनवणे, प्रा.सौ. सय्यद एम. डी. व प्रा. ए. के. पठाण, प्रशासन विभागातील श्री. एम. बी. मंडलीक व श्री राम गाडेकर तसेच श्री. पडवळ, वामन, भांगरे, छल्लारे, कडलग यांचे सहकार्य लाभले.

* * *

## ग्रंथालय - (ग्रंथपाल : प्रा. बच्छाव पी. जे.)

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालय हा त्या महाविद्यालयाचा आत्माच मानला जात आहे. याचा विचार करून आपल्या महाविद्यालयात कॅसेट, सीडीज, इंटरनेट, ई-बुक, ई-जरनल्स, ऑनलाईन डेटाबेसेस इ. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्यात आला आहे.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयात यावर्षी रु. ७५३७८ किंमतीची एकूण १८५ ग्रंथांची खरेदी केलेली आहे. तसेच ९३ नियतकालिके, २४ वर्तमानपत्रे सुरू आहेत.

ग्रंथालयात एकूण ग्रंथसंख्या ५६०८२ तर एकूण टायटलची संख्या २८,८३९ आहेत. तसेच एकूण सीडीज् २९६ आहेत.

मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, इंडेस्ट ए.आय.सी.टी.ई कन्सोर्टियम, विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, इन्फलिबनेट सेंटर, अहमदाबाद यांच्या सहकार्याने ई-ग्रंथालय संकल्पनेचा एक भाग म्हणून सुरू झालेल्या 'एन लिफ्ट' द्वारे अनेक विषयावरील ईलेक्ट्रॉनिक डॉक्युमेंट स्वरूपातील प्रचलित माहिती आज त्वरीत उपलब्ध होत आहे. 'एन लिफ्ट' मध्ये २१५४ ई-जर्नल्स् तसेच ५१७४६ ई-बुक्स उपलब्ध आहेत. त्याचा लाभ आज अनेक वाचक घेत आहेत.

ग्रंथालय आपल्या वाचकांसाठी करिअर गायडन्स, बुकबँक सुविधा, संदर्भसेवा, इंटरनेट सुविधा, बहिःस्थ सभासदांना सेवा उपलब्ध करून देत आहे.

मा. प्राचार्य तसेच ग्रंथालय समितीचे सदस्य यांच्या मार्गदर्शनानुसार ग्रंथालयातील सर्व कर्मचारी ग्रंथालयीन सेवा देण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहेत.

* * *

## कार्यालय - (अधिक्षक श्री. चंद्रभान ढवळे)

कार्यालयप्रमुख श्री. सी.आर.ढवळे यांचेकडून कार्यालयाचा अहवाल प्राप्त झाला. त्यानुसार दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सर्व प्रवेश हे संगणकीकरणानुसार देण्यात आले. यावर्षापासून शासन, विद्यापीठ व इतर सर्व संलग्न संस्था व कार्यालयाची अधिक मागणी व पाठपुरावा हा ई-मेल वर करण्यात आला. त्यानुसार आपल्याही कार्यालयाने याबाबत पुर्तता केलेली आहे.

महाविद्यालयात ११ वी पासून पद्व्युत्तर पर्यन्त एकूण ४४४० विद्यार्थी प्रवेशित आहे. वर्षभर शासन व विद्यापीठस्तरावरील विविध शिष्यवृत्या, अर्थसहाय्य व विद्यार्थ्यांचे विविध शंकेचे निरसरन करण्याचे काम कार्यालयामार्फत करण्यात आले. वेळोवळी प्रवेशासंबंधी व महाविद्यालया संबंधी आवश्यक माहिती शासन व विद्यापीठास सादर करण्यात येते.

वर्षभराचे कामकाजात विविध शासकीय अधिकारी, विद्यापीठीय व संस्थाप्रमुख महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापकवर्ग व सहकारी कर्मचारी यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

* * *

## कला मंडळ - (अध्यक्ष : प्रा.सौ. महेजबीन सय्यद)

विद्यार्थ्यांमधील सुप्त कला गुणांना वाव देऊन त्यांच्यात अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी कलामंडळ कटिबद्ध व प्रयत्नशील आहे.

दि. २२/०८/२०१२ विद्यापीठ स्तरीय - 'कन्यारत्न वाचवा अभियानांतर्गत' ॲड. एम.एन.देशमुख महाविद्यालय, राजूर येथे दोन विद्यार्थ्यांचा 'पोस्टर स्पर्धेत' सहभाग व दोन विद्यार्थ्यांचा 'घोषवाक्य स्पर्धेत सहभाग'.

दि. १५/०१/२०१३ ते १७/०१/२०१३ दरम्यान कलामंडळातर्फे मराठी गीतगायन, हिंदी गीतगायन व अभिनय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्यासाठी परीक्षक म्हणून प्रा. महेंद्र बाणाईत, प्रा. साहेबराव गायकवाड, प्रा. अश्पाक पठाण, प्रा. शेळके, प्रा.कु. कांचन कातोरे व प्रा.कु. कानवडे यांचे सहकार्य लाभले.

वार्षिक स्नेहसम्मेलनासाठी 'मोरूची मावशी' या प्र. के. अत्रे लिखित नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. याचे दिग्दर्शन प्रा. सुनील घनकुटे यांनी केले. या कामी त्यांना प्रा. संभाजी गायकवाड, प्रा. चांगदेव डोंगरे यांचे सहकार्य लाभले. विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे नियोजन व सादरीकरण करण्यासाठी प्रा. महेंद्र बाणाईत, प्रा. साहेबराव गायकवाड, प्रा. दिनेश शेळके, प्रा.कु. व्ही. एम. भोर, प्रा. कु. आर. डी. खडामकर यांचे सहकार्य लाभले. विविध गुणदर्शनात गीत, संगीत, नृत्य, नाटिका इ. कार्यक्रम सादर करण्यात आले.

कला मंडळाच्या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला व मा. प्राचार्यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

* * *

## वाङ्मय मंडळ - (अध्यक्षा : प्रा.डॉ.सौ. अकीला शेख)

वाङ्मय मंडळाच्या वतीने वार्षिक स्नेहसम्मेलनाचे औचित्य साधून काव्य वाचन, काव्य लेखन, निबंधलेखन, आणि वक्तृत्व स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. निबंध व वक्तृत्त्व स्पर्धांसाठी स्त्री-भ्रूण हत्या, महिला अत्याचार : कारणे व उपाय, दुष्काळ येऊ पाहत आहे, माणसा-माणसा कधी होशिल माणूस, पर्यावरण व माणूस असे ज्वलंत विषय समोर आले. स्पर्धकांनी अभ्यासपूर्ण विचार तळमळीने मांडले. स्पर्धांना चांगला प्रतिसाद मिळाला. स्पर्धांसाठी प्रा.सौ. रंजना कदम, प्रा.श्री. कांबळे, प्रा.श्री. खताळ भानुदास यांचे सहकार्य लाभले.

* * *

## विज्ञान मंडळ - (अध्यक्ष : प्रा. ए. टी. भाटे)

सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षामध्ये विज्ञान मंडळाचे वतीने निबंध स्पर्धा, विज्ञान प्रश्नमंजुषा तसेच विज्ञान विभागातील मान्यवरांची व्याख्याने इ. कार्यक्रम राबविण्यात आले. सर्व कार्यक्रमांना विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. सर्वच कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त झाले.

विज्ञान मंडळाच्या वतीने विज्ञान सहलींचे आयोजनही करण्यात आलेले आहे.

अशा प्रकारे विज्ञान विभागातर्फे विविध कार्यक्रम राबविले गेले. या सर्व कार्यक्रमांत मंडळातील सहकारी प्रा. के. बी. नाईकवाडी, प्रा. एम्. डी. बाणाईत तसेच प्रा. दातीर ए. एम. मराठी विभागाचे प्रा. घनकुटे यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

विज्ञान मंडळाचे वतीने निबंध स्पर्धा व विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.

* * *

## वाणिज्य मंडळ - (अध्यक्षा : प्रा.सौ. महेजबीन सय्यद)

विद्यार्थ्यांना व्यावसायिक व व्यावहारिक ज्ञान देतानाच, समाजाप्रती संवेदनशीलता व जबाबदार नागरिकत्व आणि नेतृत्व गुण विकसित करण्याच्या उद्देशाने वाणिज्य मंडळ वर्षभर कार्यरत असते.

१. १ ऑगस्ट २०१२ रोजी पटवा गिरीश-C.A. की जे महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेचेच माजी विद्यार्थी आहेत, यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना 'C.A-The best career apportunity' या विषयावर मार्गदर्शन केले.

२. २ ऑगस्ट २०१२ : बहिण भावाच्या प्रेमाचे व जबाबदारीचे प्रतीक रक्षाबंधन. वाणिज्य विभागाच्या विद्यार्थिनींनी

विद्यार्थ्यांना व शिक्षकांना राखी बांधून रक्षाबंधन दिन साजरा केला.

३. वाणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकदिनाच्या दिवशी शिक्षक, सुपरवायझर व शिपाई या सर्व भुमिका पार पाडल्या व शेवटी मनोगताद्वारे माजी राष्ट्रपती मा. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या स्मृतींना उजाळा दिला व सर्व शिक्षकांचे ऋण व्यक्त केले.

४. वाणिज्य विभाग व एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी दिल्लीमध्ये झालेल्या अमानवी कृत्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी अकोले शहरातून सद्भावना रॅली काढली.

५. १०/०१/२०१३ श्रीरामपूर येथील C.A., मा.श्री. संजय पगारे यांनी विणिज्य विभागाच्या विद्यार्थ्यांना 'सुरक्षित गुंतवणूक कशी करावी?' यावर मार्गदर्शन केले.

६. १४/०१/२०१२ मकर-संक्रांत हा सण विद्यार्थ्यांनी तिळगुळ देऊन-घेऊन साजरा केला व या सणाच्या वैज्ञानिक दृष्टिकोनावर प्रकाश टाकला.

या वर्षी कॉमर्स फेस्टीव्हल फेब्रुवारी महिन्यात करण्याचे नियोजन आहे. त्यात तज्ञांचे मार्गदर्शन, मि. कॉमर्स व मिस्. कॉमर्स ची निवड, गटचर्चा, वादविवाद स्पर्धा, पेपर प्रेझेंटेशन व कॉमर्स एक्झीबीशन हे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ या वर्षात वाणिज्य मंडळांतर्गत वरील उपक्रम राबविण्यात आले. सदर उपक्रमामध्ये प्रा. बी.आर.शिंदे, प्रा.एस.बी.पगारे, प्रा.डॉ.सौ.अकीला शेख, प्रा. एस.ए.पलांडे, प्रा.व्ही.के.भांगरे, प्रा.व्ही.के.बाणकर, प्रा. कातोरे व कानवडे, प्रा. सुनील घनकुटे, प्रा. शेटे यांचे सहकार्य लाभले.

* * *

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र, अकोले

**(केंद्रसंयोजक : प्रा.डॉ. अविनाश झांबरे)**

सन २०१२-२०१३ वर्षात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक संचलित अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले या अभ्यासकेंद्रात 'मागेल त्याला शिक्षण, सर्वांसाठी शिक्षण व काम करता करता शिक्षण' हे विद्यापीठाचे ब्रिद वाक्य घेऊन या वर्षी आपल्या अभ्यासकेंद्रात जून-नोव्हेंबरच्या पूर्वतयारी अभ्यासक्रमाच्या पहिल्या तुकडीसाठी १५३ तर प्रथम वर्ष कला या वर्गासाठी १७३, द्वितीय वर्ष कला या वर्गासाठी ११०, तृतीय वर्ष कला या वर्गासाठी ८८, प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गासाठी १४, द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गासाठी १०, व तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गासाठी ०५ असे एकूण ५५३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. या सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक रविवारी समंत्रणाचे आयोजन केले जाते. जानेवारी-मे च्या पूर्वतयारी अभ्यासक्रमाच्या तुकडीसाठी विद्यार्थी प्रवेश घेत आहे. मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे त्यांच्या मार्गदर्शनांतर्गत सर्व काम असून सदर अभ्यास केंद्रासाठी श्री. संजय फटांगरे (केंद्र सहाय्यक) व श्री. किरण नेहे (शिपाई) यांच्या मोलाच्या सहकार्याने सर्व विद्यार्थ्यांचे प्रशासकीय व शैक्षणिक कामकाज फार सुरळीत सुरू आहे.

* * *

## बहिःशाल शिक्षण मंडळ - (केंद्र कार्यवाहक प्रा. भानुदास रवताळ)

बहिःशाल शिक्षण मंडळातर्फे दि. १७/१२/२०१२ ते १९/१२/२०१२ या कालावधीत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन मौजे निंब्रळ, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे करण्यात आले आहे.

त्याप्रसंगी प्रा. बाळासाहेब खरात यांचे 'लोकरंजणातून लोकशिक्षण' प्राचार्य डॉ. के. के. देशमुख यांचे 'माती परीक्षण : आधुनिक शेतीची गुरूकिल्ली' व सौ. वृषाली गायकवाड यांचे 'यशस्वी जीवनाची गुरूकिल्ली' या विषयावर मार्गदर्शन लाभले.

सदर उपक्रमासाठी प्रा. अभिमन्यु केदार, प्रा. यासीन सय्यद यांचे सहकार्य लाभले.

तसेच यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त बहिःशाल शिक्षण मंडळांतर्गत तीन दिवसीय व्याख्यान मालेचे आयोजन फेब्रुवारी २०१३ मध्ये करण्यात येणार आहे. तसेच ज्येष्ठ नागरिक साह्यता कक्ष अंतर्गत जेष्ठ नागरिकांचे एक दिवसीय शिबीराचे आयोजन फेब्रुवारीमध्ये करण्यात येणार आहे.

* * *

**आरोग्य विभाग - ( समन्वयक : प्रा. के. बी. नाईकवाडी)**

या योजनेअंतर्गत प्रथम वर्ष विज्ञान, कला, वाणिज्य, बी.सी.ए., बी.बी.ए. बी.सी.ए. या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी मा.डॉ. सतीष व डॉ.सौ. अर्चना खताळ यांनी पूर्ण केली.

या तपासणी शिबीरात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांस आरोग्य संवर्धनाकरिता योग्य त्या सूचना व सल्ला देण्यात आला.

या कामी प्रा.आर.एम.कदम, प्रा.आर.के.वाघमारे आणि प्रा.ए.के.पठाण यांचे सहकार्य लाभले.

* * *

**दलित वस्ती सुधार योजना - (आयोजक : प्रा. साहेबराव गायकवाड)**

अकोले महाविद्यालयाच्या वतीने इंदिरानगर अकोले दलितवस्ती सुधारणात्मक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या वर्षी आण्णाभाऊ साठे महामंडळाच्या वतीने मागासवर्गीय तरुणांना उद्योगासाठी अर्थसहाय्य दिले जाते. या वर्षी इंदिरानगर वस्तीतील एकूण २१ तरुणांचे २१ लाख रुपये कर्ज प्रकरणे करण्यात आली असून थोड्याच कालावधीत सर्व प्रकरणे मंजुर होतील अशी आशा आहे.

तसेच खादीग्रामोद्योग व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना २०,०००/- पर्यंतचे अर्थ-सहाय्य व कर्ज प्रकरणे व कर्ज प्राप्त करून देण्यात आले.

* * *

**मागासवर्गीय विद्यार्थी मैत्री संघ - (संयोजक : प्रा. साहेबराव गायकवाड)**

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी अहमदनगर आदेशानुसार मागासवर्गीय विद्यार्थी मैत्री संघ महाविद्यालयात कार्यरत असून सरकारच्या विविध योजना व शिष्यवृत्ती संबंधी माहिती वेळोवेळी मागासवर्गीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविली जाते.

मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीचे सर्व फॉर्म नेटवर उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांना वेळोवेळी झालेला बदल प्रत्यक्ष त्यांच्या निदर्शनात आणून दिला जातो. या उपक्रमासाठी डॉ. एस.एम. सोनवणे, प्रा. सोपान साळवे, प्रा. राहुल वाघमारे, प्रा.सौ. रंजना कदम यांचे सहकार्य लाभले.

* * *

**विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास व निर्भय कन्या अभियान**
**(अध्यक्षा : प्रा.सौ. महेजबीन सय्यद)**

१. १२/०१/२०१३ - निर्भय कन्या अभियानांतर्गत महाविद्यालयातील १५० विद्यार्थिनी व इतर महाविद्यालयातील १८ विद्यार्थिनींना 'स्वरक्षणासाठी कानमंत्र' म्हणजेच ज्युदो-कराटे चे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी प्रमुख पाहुण्या - सभापती, अकोले तालुका पंचायत समिती श्रीमती अंजनाताई बोंबले यांनी 'स्त्रियांनी आपल्यातील स्वत्व ओळखावे' यावर मार्गदर्शन केले तर ॲड. सौ. मंगलाताई हांडे यांनी 'स्त्रियांच्या रक्षणासाठी-कायदा' यावर मार्गदर्शन केले व नंतर मा.श्री. सुभाष मिंढे यांनी तीन तास ज्युदोचे प्रशिक्षण दिले.

२. १५/०१/२०१३ - महाविद्यालयाचे प्राचार्य मा. रमेशचंद्रजी खांडगे यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधला व आजच्या वातावरणात स्वतःचे रक्षण कसे करावे, स्वतःचे व्यक्तिमत्त्व कसे खंबीर बनवावे यावर मार्गदर्शन केले.

यासाठी डॉ.सौ. अकिला शेख, प्रा.सौ. रंजना कदम, प्रा. कु. व्ही.एम्. भोर, प्रा.कु. आर.डी.खडामकर व प्रा.श्री. अशोक दातीर यांचे विशेष सहकार्य लाभले.

* * *

**नारीमंच - (अध्यक्षा : प्रा. महेजबीन सय्यद)**

१. पुरूषप्रधान संस्कृतित स्त्रियांना आपल्या विचारांची मुक्त देवाण-घेवाण करता यावी, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी नारीमंच प्रयत्नशील असते. ३/९/२०१२ रोजी विद्यार्थिनीमंचचे उद्घाटन - धडाडीच्या कार्यकर्त्या मा.ॲड. वर्षाताई देशपांडे यांच्या हस्ते झाले. त्यांनी स्त्री-भ्रूण हत्या-एक कलंक व त्यावर उपाययोजना यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला मा.ॲड. श्री.के.बी.हांडे (अ.ता.एज्यु.सोसायटी-खजिनदार) हे अध्यक्ष म्हणून लाभले. त्यांनी 'स्त्रियांचे समाजातील महत्त्व' यावर मार्गदर्शन केले. त्यात सामाजिक कार्यकर्तेमा.श्री. कैलास जाधव यांनी सामाजिक पोवाडा सादर केला.

या कार्यक्रमासाठी मा. प्राचार्यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रा.सौ. रंजना कदम, प्रा.श्री. विजय भगत सर, प्रा.श्री. सचिन पलांडे सर व वाणिज्य विभागाच्या स्वयंसेवकांचे सहकार्य लाभले.

* * *

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन / नालंदा अभ्यास केंद्र

**(समन्वयक : प्रा.डॉ.विजय भगत)**

विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांबाबत माहीती करून देण्याचे काम सदर विभागाद्वारे केले जाते. वर्षाच्या सुरवातीलाच एम.पी.एस.एस्सी. च्या पी.एस.आय., एस.टी.आय. व असिस्टंट तसेच राज्यसेवा परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. तसेच अभ्यास करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती मदत करण्यात आली.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या "Coaching Classes for Entry in services for SC/ST/OBC (non-creamy layer) & Minorities under the UGC Scheme." च्या अनुदानातून कायम स्वरूपी स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. या केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. मार्गदर्शन वर्गातील विद्यार्थ्यांसाठी सकाळी ७ ते रात्री ९ अशी १४ तास कार्यरत असलेल्या स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था करण्यात आली. आठवड्यातून एक सराव चाचणी घेतली जाते.

यशस्वी विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | विद्यार्थ्याचे नाव | परीक्षेचे नांव | परीक्षा घेणारे मंडळ | पदाचे नांव | वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सचिन वामन सरगर | Security Assistant/ executive in intelligent Burro | Staff Selection Commitation | Security Assistant/ executive in intelligent Burro | 2012 | |
| | | पोलिस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा २०१२ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग | पोलिस उपनिरीक्षक | | |
| २ | अभिदास दिलीप धुमाळ | पोलिस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा २०१२ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग | पोलिस उपनिरीक्षक | 2012 | |
| ३ | योगेश शिवाजी शिंदे | पोलिस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा २०१२ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग | पोलिस उपनिरीक्षक | 2012 | |
| ४ | अभिषेक सुरेश जाधव | CA-CPT Exam 2012 | CA Institute | CA | 2012 | |

केंद्र सहायक श्री. सचिन दोरगे यांचे अभ्यास केंद्राच्या सर्वच कार्यात विशेष उल्लेखनिय योगदान आहे.

सदर उपक्रम राबविण्यासाठी प्रा. संजय पगारे, प्रा. संजय ताकटे यांचे सहकार्य लाभत आहे.

* * *

# कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना

**(कार्यक्रम अधिकारी : प्रा. भांगरे बी. के.)**

सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात कमवा व शिका योजनेत एकूण ९५ विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत. सदर योजनेसाठी पुणे विद्यापीठाकडून जवळपास २ लाखांपर्यंत अनुदान म्हणून देण्यात येते. आपल्या महाविद्यालयात कमवा व शिका या योजनेत विद्यार्थ्यांपेक्षा, विद्यार्थिनींची संख्या व सहभाग जास्त आहे. सदर योजनेअंतर्गत सन २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालय परिसर स्वच्छ करणे, झाडे लावणे, झाडांची निगा राखणे, झाडांना पाणी देणे, कार्यालयीन कामे करणे, महाविद्यालयातील ग्रंथालय, प्रयोगशाळा इ. विभागात सहाय्यक म्हणून कामे करणे, बागेची निगा राखणे, इत्यादी प्रकारची कामे नियमितपणे दररोज दोन तास या प्रमाणे करण्यात आली व फेब्रुवारी महिन्यात सुद्धा करण्यात येणार आहेत. सदर योजना यशस्वी होण्यासाठी प्रा.डॉ.एस.बी.खेमनर, प्रा.डॉ.शेडगे, प्रा.वाघमारे, प्रा.खताळ या सर्वांचे सहकार्य लाभले.

सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक - पुंडे प्रविण भाऊसाहेब (टी.वाय.बी.एस्सी.)

सर्वोत्कृष्ट स्वयंसेविका - मेंगाळ किशोरी भास्कर (एस.वाय.बी.ए.)

* * *

## हिंदी विभाग - (अध्यक्षा - डॉ. सौ. अकीला शेख)

हिंदी विभागातर्फे 'हिंदी दिवस समारोह'चे अयोजन केले गेले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे विभागाचे माजी विद्यार्थी श्री. भरत वाकचौरे लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.श्री. साहेबराव गायकवाड यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. रोहिणी डावरे व आभार प्रा.श्री. संतोष गावंडे यांनी मानले.

हिंदी विभागाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने प्रा.डॉ. अकीला शेख व त्यांचे पती प्रा. महेबूब शेख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हिंदी विभाग प्रमुख डॉ. अकीला शेख यांना राष्ट्रीय हिंदी परिषद मेरठ (उत्तर प्रदेश) चा राष्ट्रीय पातळीवरील 'हिंदी रत्न' हा पुरस्कार मिळाल्याचे निमित्त साधून 'सत्कार समारोह' आयोजित केला गेला. अ.ता.ए.सोसायटीचे अध्यक्ष मा.जे.डी. आंबरे पाटील यांच्या हस्ते प्रा.डॉ.सौ. अकीला शेख यांचा सत्कार शॉल, साडी,श्रीफळ, देऊन करण्यात आला व अ.ता.ए.सोसायटीचे सचिव मा. यशवंतराव आभाळे यांच्या हस्ते प्रा. महेबूब शेख यांचा शॉल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. साहेबराव गायकवाड यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. के. बाणकर यांची विशेष उपस्थिती होती.

विभागाच्या दोन्ही कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. नाईकवाडी योगिता हीने केले.

विभागासाठी प्रा. एस. एस. गायकवाड, प्रा. कल्पना शिंदे व प्रा. संतोष गावंडे यांचे सहकार्य लाभले.

* * *

## Department Of Botany

(B. S. Deshmukh)

**Educational Tours :**

Educational tours organized by Botany Department for student for students as-

1. Vani-Saputara (Guj.) on 25/01/2013 for F.Y.B.Sc. Students.
   No. of students participated 95.
2. Harishchandra Gad on 20/01/2013, for S.Y.B.Sc. student.
   Number of student participated 35.

* * *

**भूगोल विभाग - (विभाग प्रमुख - प्रा.डॉ. शिवाजी खेमनर)**

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये भूगोल विभागासाठी आणि आपल्या सर्वांसाठी आनंदाची, महत्त्वाची बाब म्हणजे 'भूगोल संशोधन केंद्रासाठी' पुणे विद्यापीठाने मान्यता दिली आहे. भूगोल विभागामार्फत एम.ए. भूगोल विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल तवा धबधबा, पट्टा किल्ला या ठिकाणी नेण्यात आली. पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल सापुतरा येथे नेण्यात येणार आहे. भूगोलदिनानिमित्त प्राचार्य सहदेव चौधरी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, प्रश्नमंजूषा स्पर्धा, आदि स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना विविध विषयांवर चर्चा, विचार विनीमय करण्याची संधी देण्यात आली. भूगोल विभागातील शिक्षकांनी राज्यस्तरीय, राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय कार्यशाळा, चर्चासत्रांमध्ये सहभाग घेवून पेपर वाचन केले.

यासाठी संस्था पदाधिकारी, प्राचार्य यांचे अनमोल सहकार्य लाभले. तसेच प्रा.डॉ. विजय भगत, प्रा. दिपक गाडेकर, प्रा. रविंद्र मेढे, आदि सर्वांनी बहुमोल सहकार्य केले.

* * *

**भूगोल पद्व्युत्तर संशोधन केंद्र (समन्वयक : प्रा.डॉ. विजय भगत)**

महाविद्यालयात 'पीएच.डी.' पदवीसाठी 'भूगोल पदव्युत्तर संशोधन केंद्रास' शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ पासून 'पुणे विद्यापीठाने' मान्यता दिलेली आहे. त्यासाठी विभागात संगणक प्रयोगशाळा, जीआयएस प्रणाली व सुदूर संवेदन प्रयोगशाळा, सर्व्हेक्षण प्रयोगशाळा, माती परीक्षण प्रयोगशाळा व आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांमध्ये प्रसिद्ध झालेल्या शोध निबंधांचा डाटाबेस संगणकीय प्रणालित तयार करण्यात आला. या केंद्राच्या उभारणीसाठी भूगोल विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. शिवाजी खेमनर, प्रा. सुनील मालुंजकर, प्रा. दिपक गाडेकर, प्रा. सुजाता कोटकर, प्रा. रवींद्र मेढे, प्रा. गणेश पुंडे, रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. संजय ताकटे, प्रा. एस. के. मालुंजकर, प्रा. अशोक दातीर, प्रा. संदेश कासार, श्री. सी.आर ढवळे, श्री. एस.बी.बगाड, श्री. प्रविण घुले, आणि श्री. अतुल फापाळे यांनी सहकार्य केले. मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे या कामी विशेष मार्गदर्शन लाभले.

महाविद्यालयातील या विशेष विभागाच्या उभारणीबद्दल संस्थेचे विश्वस्त मा.आ. मधुकररावजी पिचड, सर्व विश्वस्त, अध्यक्ष, मा. जे. डी. आंबरे पा., सेक्रेटरी मा. यशवंतराव आभाळे आणि कार्यकारिणीतील सर्व सदस्यांनी मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, संशोधन केंद्राचे समन्वयक डॉ. विजय भगत, भूगोल विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी खेमनर व सर्व संबंधितांचे अभिनंदन केले.

* * *

**राज्यशास्त्र विभाग - (विभाग प्रमुख : प्रा. अभिमन्यू केदार )**

शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.ए.) सुरू करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसाठी शिबीर, चर्चासत्र, कार्यशाळा व विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

फेब्रुवारीमध्ये विभागाची संशोधनपर सहलीचे आयोजन केलेले आहे.

* * *

**गणित विभाग - (विभाग प्रमुख : प्रा. बाळासाहेब मेहेत्रे)**

एस.पी. कॉलेज पुणे व टी.आय.एफ आर. मुंबई, बी. ए. आर. सो. मुंबई यांचे विद्यमाने घेण्यात येणारी 'माधवा मॅथेमॅटीक्स् कॉम्पीटीशन' महाविद्यालयात सलग तिसऱ्या वर्षी घेण्यात आली. या परीक्षेस प्रथम व द्वितीय वर्ष विज्ञान वर्गातील १०८ विद्यार्थी बसले होते. नॅशनल बोर्ड ऑफ हायर मॅथेमेटीक्स नवी दिल्ली यांचे आर्थिक अनुदानावर ही परीक्षा राज्यात आयोजित केली जाते. विद्यार्थ्यांची गणितातील रूची वाढविण्यासाठी सदर परीक्षा उपयुक्त आहे.

* * *

## शैक्षणिक व संशोधन विभाग (प्रा.डॉ. बाबासाहेब देशमुख)

या विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती निर्माण होण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. पुणे विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ''अविष्कार २०१३'' या संशोधन स्पर्धेत एकूण ४ विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपले प्रोजेक्ट सादर केले. सदर स्पर्धा राहूरी महाविद्यालयात घेण्यात आली.

सहभागी विद्यार्थी - १. कु. वाकचौरे प्रियांका सुधाकर
२. देशमुख प्रदिप अरविंद,
३. कु. डोंगरे शुभांगी संपत
४. कु. तोरमल विशाखा शांताराम

यातील - दोन विद्यार्थ्यांच्या प्रोजेक्टची विद्यापीठ पातळीवर निवड झाली.

सदर विद्यार्थ्यांना प्रा.डॉ. बाबासाहेब देशमुख व प्रा. राहुल वाघमारे यांनी मार्गदर्शन केले.

* विभागाच्या वतीने विद्यार्थिनींसाठी ''कॉमन रूम''च्या बांधकामाचा प्रस्ताव तयार करून पुणे विद्यापीठास सादर करण्यात आला आहे.

* * *

## संगणक व व्यवस्थापन विभाग - (विभाग प्रमुख : प्रा. के. एस. गुंजाळ)

संख्यात्मक सुधारणेऐवजी गुणवत्ता व दर्जा उंचावण्यासाठी विभागाच्या वतीने नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी द्वितीय व तृतीय वर्ष विद्यार्थ्यांनी स्वागत समारंभ आयोजित केला. तसेच बी.बी.ए./ बी.सी.ए./ बी.सी.एस. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी नामवंत व्याख्यात्यांचे व्याख्याने आयोजित केले गेले. शैक्षणिक उपक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांमधील संशोधन व जिज्ञासा जागृत व्हावी म्हणून दरवर्षी संगणक प्रदर्शन आयोजित करण्यात येते. शैक्षणिक उपक्रमांबरोबर व्यक्तिमत्त्व विकास, गुणवत्ता दर्जा सुधारण्यासाठी विभागातील सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले.

* * *

## नियतकालिक- 'अगस्त्य' (संपादक : प्रा.डॉ.सौ. अकीला शेख)

सन १९७५-७६ या शैक्षणिक वर्षापासून 'अगस्त्य' नियतकालिकाची परंपरा चालू आहे. ही वाटचाल कायम ठेवण्यासाठी सन २०११-१२ मध्ये मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ.सौ.अकीला शेख यांनी 'स्त्री-भ्रूणहत्या' या विषयाला प्राधान्य देत नियतकालिकाचे संपादन केले. यासाठी प्रा. संजय पगारे, प्रा. विवेक वाकचौरे, प्रा. सुनील घनकुटे, प्रा. रोहिणी डावरे, प्रा. महेजबीन सय्यद यांचे सहकार्य लाभले.

* * *

# वार्षिक अहवाल

## कनिष्ठ महाविद्यालय

-: संकल्पना :-

**प्राचार्य रमेशचंद्र खांडगे**

-: शब्दांकन व मांडणी :-

**प्रा.कु. खडामकर आर. डी.**

**विद्यार्थी मंडळ - (अध्यक्ष : प्रा. बाळासाहेब शेटे)**

शैक्षणिक वर्षात गुणानुक्रमे प्रथम असणाऱ्या विद्यार्थ्यांची वर्गप्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. एकूण १८ वर्ग प्रतिनिधींची निवड करण्यात आली. जिमखाना, राष्ट्रीय सेवा योजना, कला मंडळ व विद्यार्थिनी प्रतिनिधी या चार सदस्यांची निवड करून २२ विद्यार्थी सदस्यांचे विद्यार्थी मंडळ स्थापन करण्यात आले. मा. प्राचार्य व उपप्राचार्य यांचे समवेत (G.S.) जनरल सेक्रेटरी निवडणूक घेण्यात आली. कु. शिवानी अशोक डुंबरे ही कनिष्ठ महाविद्यालयाची जनरल सेक्रेटरी म्हणून निवडून आली.

दि. ३०/०८/२०१२ रोजी संस्थेचे उपाध्यक्ष मा. वसंतराव मनकर साहेब यांचे हस्ते व प्रमुख पाहुणे भानुदास वैरागी यांचे उपस्थितीत विद्यार्थी मंडळाचे उदघाटन झाले. त्या प्रसंगी भानुदास बैरागी व त्यांचे सहकाऱ्यांनी 'नाथांच्या संगीतमय भारूडाचा' कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाचा संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी आनंद घेतला.

मंडळाच्या वतीने 'गोपालकाला' या दिवशी प्रत्येक वर्गाचे एक गोविंदा पथक तयार करून महाविद्यालयाच्या प्रांगणात दही हंडी बांधून दही हंडी फोडण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. १२ वी कला 'अ' व १२ वी कला 'क' या वर्गाच्या गोविंदा पथकांनी प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविला. त्यांना महाविद्यालयाकडून १०००रू व द्वितीय क्रमांकास ७५०रू बक्षीस देण्यात आले.

**५ सप्टेंबर शिक्षक दिन -**

महाविद्यालयात ५ सप्टेंबर शिक्षक दिन साजरा करण्यात आला. त्यामध्ये ९८ विद्यार्थी शिक्षकांनी भाग घेतला. त्यानंतर विद्यार्थी शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त करून शिक्षकांबद्दल आदर व्यक्त केला. त्यातून आदर्श विद्यार्थी शिक्षक व विद्यार्थिनी शिक्षकेची निवड करण्यात आली.

वार्षिक स्नेह सम्मेलनानिमित्त महाविद्यालयात पारंपारिक वेश-भूषा दिवस, सारी डे असे दिवस साजरे करण्यात आले. विद्यार्थी मंडळातील सदस्यांनी वर्गातील शिस्त स्वच्छता राखण्याचा प्रयत्न केला. तसेच गरीब व आजारी विद्यार्थ्यांना मदत गोळा करून सामाजिक कार्य केले.

या सर्व कार्यक्रमांसाठी जी.एस. कु. शिवानी डुंबरे व एल.आर. कु. सायली कर्पेसर्व विद्यार्थी मंडळ सदस्य तसेच प्रा. ओंकारनाथ राठी, प्रा. विवेक वाक्चौरे, प्रा. बाबासाहेब शेवाळे, प्रा. अशोक कडलग व प्रा. तानाजी जाधव यांचे सहकार्य लाभले !

* * *

**क्रीडा समिती**

शैक्षणिक वर्षात विविध खेळांचे संघ तालुका, जिल्हा विभाग, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी पाठविण्यात आले.

*** कबड्डी :-** तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा दि. २९ ते ३१ ऑगष्ट २०१२ रोजी अगस्ती विद्यालय, अकोले येथे पार पडल्या. स्पर्धेत आपल्या मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले. संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेला संघ -

जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल अ.नगर येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला होता.

*** खो-खो :-** तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा दि. २२ व २३ ऑगष्ट २०१२ रोजी अगस्ती विद्यालय अकोले येथे पार पडल्या. यामध्ये आपल्या विद्यालयाचा मुलांचा संघ विजयी झाला. या संघाची अकोले तालुक्यातर्फे जिल्हास्तरीय निवड झाली.

जिल्हा स्पर्धेसाठी निवड झालेला संघ

जिल्हा स्तरीय खो-खो स्पर्धा भेंडा ता. नेवासा येथे पार पडल्या. यात आपला संघ सहभागी झाला.

*** बॅडमिन्टन :-** जिल्हास्तरीय बॅडमिन्टन स्पर्धा तालुका क्रीडा संकुल संगमनेर येथे दि. २७ व २८ ऑगस्ट २०१२ रोजी पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या मुले व मुली या दोन्ही संघानी सहभाग घेतला.

उपविजयी संघातील दोन खेळाडूंची अ.नगर जिल्हा तर्फे पुणे विभागीय निवड चाचणी स्पर्धेसाठी निवड झाली.

१) कु. साबळे प्रणित काशिनाथ　　　　२) कु. कराळे दिप्ती जालिंदर

*** कुस्ती :-** तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा अॅड्. मनोहरराव देशमुख महाविद्यालय, राजूर येथे दि. २७ व २८ ऑगष्ट २०१२ रोजी पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या पुढील खेळाडूंनी प्रविण्य मिळविले.

१) वर्पेविशाल बाळासाहेब - ७४ कि.ग्रॅ. वजनगट - प्रथम क्रमांक

२) शिंदे अमोल काशिनाथ - ६६ कि.ग्रॅ. वजनगट - द्वितीय क्रमांक

३) बोऱ्हाडे बलराज कैलास - ४६ कि.ग्रॅ. वजनगट - द्वितीय क्रमांक

*** बुद्धीबळ :-** जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, अ.नगर येथे दि. ११ व १२ स्पटें.२०१२ रोजी पार पडल्या. या स्पर्धांमध्ये आपल्या महाविद्यालयाचा मुलांचा संघ सहभागी झाला.

*** क्रिकेट :-** जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा भेंडा ता. नेवासा येथे पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा मुलांचा संघ सहभागी झाला.

*** अॅथलेटिक्स :-** (मैदानी स्पर्धा) तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा दि. ३ व ४ सप्टें. २०१२ रोजी अकोले महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडल्या. या स्पर्धेत सात खेळाडूंनी प्राविण्य मिळविले.

वरील खेळाडूंची अकोले तालुक्यातर्फे जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. जिल्हास्तरीय स्पर्धा संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे पार पडल्या.

*** अॅक्रोबेटिक्स :-** जिल्हास्तरीय अॅक्रोबेटिक्स स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाच्या पुढील खेळाडूंची निवड झाली. कु. भोर ज्योती

*** तायक्वोंदो :-** जिल्हास्तरीय तायक्वोंदो स्पर्धा अकोले येथे पार पडल्या. या स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी पुढील खेळाडूंची निवड झाली.

१) कु. पापळ स्नेहल बाबाजी , २) कु. नवले ऐश्वर्या गुलाबराव, ३) कु. थोरात अभिजीत दिलीप

पुणे विभागीय तायक्वोंदो स्पर्धेतून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पुढील खेळाडूंची निवड झाली. कु. पापळ स्नेहल बाबाजी

राज्यस्तरीय तायक्वोंदो स्पर्धा औरंगाबाद येथे पार पडल्या.

*** थ्रो बॉल :-** जिल्हास्तरीय थ्रो बॉल स्पर्धा दि. २१ व २२ सप्टें. २०१२ रोजी कोपरगाव येथे पार पडल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचे मुले व मुली हे दोन्ही संघ सहभागी झाले.

*** सॉफ्ट बॉल :-** जिल्हास्तरीय सॉफ्ट बॉल स्पर्धा राहूरी विद्यापीठ राहूरी येथे दि. १४ सप्टें २०१२ रोजी पार पडल्या. या स्पर्धेतून पुणे विभागीय निवड चाचणी स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाच्या पुढील खेळाडूंची निवड झाली.

१) शेख अबूरेहान मुश्ताक　　२) नवले विनोद रमेश　　३) दाते सागर सखाहारी

पुणे विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धा आझम कॅम्पस पुणे येथे पार पडल्या. यामध्ये आपले खेळाडू सहभागी झाले.

*** नेटबॉल :-**

जिल्हास्तरीय शालेय नेटबॉल स्पर्धा दि. १२ व १३ ऑगष्ट २०१२ रोजी आपल्या महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे मुले व मुली हे दोन्ही संघ विजयी झाले. या दोन्ही संघांचे पुणे विभागीय स्पर्धेसाठी

अ.नगर जिल्ह्यातर्फे निवड करण्यात आली.

पुणे विभागीय नेटबॉल स्पर्धा अकोले महाविद्यालय अकोले येथे दि. ११ व १२ आक्टो. २०१२ रोजी पार पडल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले व मुलांच्या संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

विजयी झालेल्या मुलींच्या संघाची पुणे विभागातर्फे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

१) शेख अबूरेहान मुश्ताक २) धुमाळ शुभम् विनायक

राज्य स्तरीय नेटबॉल स्पर्धा औरंगाबाद येथे पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा मुलींचा संघ तसेच वरील दोन खेळाडू सहभागी झाले.

* राज्यस्तरीय शालेय नेटबॉल स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या संघाची निवड करण्यात आली. या महाराष्ट्राच्या संघात आपल्या महाविद्यालयाची कु. नवले तेजश्री राजेंद्र हिची निवड झाली.

* राष्ट्रीय शालेय नेटबॉल स्पर्धा तिरूपती, आंध्रप्रदेश येथे १३ ते १७ जाने. २०१३ रोजी पार पडल्या.

*** नेटबॉल :-** महाराष्ट्र राज्य नेटबॉल असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय ज्युनिअर नेटबॉल अजिंक्यपद स्पर्धा राजगुरूनगर, पुणे येथे दि. १४ ते १६ नोव्हेंबर २०१२ रोजी पार पडल्या. या स्पर्धेसाठी अ.नगर जिल्हा संघात आपल्या महाविद्यालयाच्या सात खेळाडुंची निवड झाली.

*** हॅन्डबॉल :-** जिल्हास्तरीय शालेय हॅन्डबॉल स्पर्धा तालुका क्रीडा संकुल दि. २३ ऑगष्ट २०१२ रोजी पार पडल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचे मुले व मुली हे दोन्ही संघ सहभागी झाले. यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले. या संघाची अ.नगर जिल्ह्यातर्फे पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच मुलांच्या संघातील दोन खेळाडूंची पुणे विभागीय निवड चाचणी स्पर्धेसाठी निवड झाली.

१) भालेराव ऋषीकेश आनंद २) धुमाळ शुभम विनायक

* पुणे विभागीय शालेय हॅण्डबॉल स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल सोलापूर येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले. या संघाची पुणे विभागातर्फे राज्यस्तरीय शालेय हॅण्डबॉल स्पर्धेसाठी निवड

* राज्यस्तरीय शालेय हॅण्डबॉल स्पर्धा विभागीय क्रीडा संकुल, नागपूर येथे दि. ५ ते १० नोव्हेंबर २०१२ रोजी पार पडल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या संघाने ब्रांझपदकाचा मानकरी ठरला.

या ब्रांझपदक विजेत्या संघातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली. १) कु. प्रेरणा बाबू एखंडे २) कु. पल्लवी राधाकिसन घुले

राष्ट्रीय शालेय हॅन्डबॉल स्पर्धा हिमाचल प्रदेश येथे होणार आहेत.

*** हॅन्डबॉल :-** राज्यस्तरीय ज्युनिअर हॅन्डबॉल अजिंक्यपद स्पर्धा - स्पर्धास्थळ बीड

महाराष्ट्र राज्य हॅन्डबॉल असोसिएशनच्या वतीने राज्य स्तरीय हॅन्डबॉल स्पर्धा बीड येथे होणार आहेत. यासाठी अ.नगर जिल्हा हॅण्डबॉल असोशिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निवड चाचणी स्पर्धेतून आपल्या महाविद्यालयाच्या तीन खेळाडूंची अ.नगर जिल्हा संघात निवड झाली.

*** रोप मल्लखांब :-** जिल्हास्तरीय शालेय रोप मल्लखांब स्पर्धा अ.नगर येथे पार पडल्या. या स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी अ.नगर जिल्ह्यातर्फेआपल्या महाविद्यालयाची कु. ज्योती भोर हिची निवड झाली.

*** टग ऑफ वार :-** (रस्सीखेच मुली) राज्यस्तरीय टग ऑफ वार अजिंक्यपद स्पर्धा

स्पर्धास्थळ - जालना

महाराष्ट्र टग ऑफ वार असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय टग ऑफ वार अजिंक्यपद स्पर्धा जालना येथे पार पडल्या. या

स्पर्धेसाठी अ.नगर जिल्हा संघात आपल्या महाविद्यालयाच्या पुढील खेळाडूंची निवड झाली.

१) कु. साबळे चैताली अरूण  २) कु. वर्पेरोहीनी ज्ञानेश्वर

३) कु. कर्पेसायली सावळेराम  ४) कु. वाक्चौरे पुजा शांताराम

* राज्यस्तरीय स्पर्धेतून महाराष्ट्र राज्याच्या संघाची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या कु. साबळे चैताली अरूण हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली.

* राष्ट्रीय टग ऑफ वार स्पर्धा जयपूर, राजस्थान येथे पार पडल्या. यामध्ये महाराष्ट्र राज्याचा संघ सुवर्णपदक विजेता ठरता. म्हणजेच आपल्या महाविद्यालयाची खेळाडू कु. चैताली अरूण साबळे सुवर्णपदक व विजेत्या ट्रॉफीची मानकरी ठरली.

*** टग ऑफ वार :-** (रस्सीखेच मुले) राज्यस्तरीय टग ऑफ वार असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय टग ऑफ वार अजिंक्यपद स्पर्धा बीड येथे पार पडल्या. या स्पर्धेसाठी अ.नगर जिल्हा टग ऑफ वार असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा स्तरीय निवड चाचणी परीक्षेतून आपल्या महाविद्यालयाच्या सात खेळाडूंची अ.नगर जिल्हा संघात निवड झाली होती.

*** वार्षिक क्रीडा स्पर्धा :-** सालाबादप्रमाणे याहीवर्षी वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

क्रीडा विभागाचे कामकाज करीत असताना वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, उपप्राचार्य प्रा. आत्माराम काळे, पर्यवेक्षक प्रा. एस.टी. चासकर, क्रीडा विभाग, समिती सदस्य, सर्व प्राध्यापक वर्ग, महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच गावातील अनेक सेवाभावी संस्था व्यक्ती क्रीडा प्रेमी यांनी वेळोवेळी सहकार्य केले. त्यांचे क्रीडा विभाग सदैव ऋणी राहील.

* * *

**कला मंडळ (अध्यक्ष : प्रा. बी. एस. शेवाळे )** - शैक्षणिक वर्षात कला मंडळाच्या वतीने गीत गायन स्पर्धा, अभिनय, नृत्य, मेहेंदी, रांगोळी इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेकरिता मंडळातील सदस्य प्रा. जी.बी. देशमुख, प्रा. बिराजदार, प्रा. अंजना नवले यांनी काम पाहिले. परीक्षक म्हणून प्रा. ओंकारराठी, प्रा. रूपाली जाधव, प्रा.एम.पी. घोलप, प्रा.ए.डी. कडलग, प्रा.टी.एस. जाधव, प्रा. कांडेकर यांनी काम पाहिले. वार्षिक स्नेह सम्मेलनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

* * *

## राष्ट्रीय सेवा योजना (+२ स्तर) - (कार्यक्रम अधिकारी : प्रा. गणपत नवले)

'Not Me But You' 'माझ्यासाठी नव्हे, तुमच्यासाठी'

राष्ट्रीय सेवा योजनेसाठी १०० विद्यार्थी संख्या मंजूर आहे. यानुसार सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षासाठी ५० विद्यार्थी व ५० विद्यार्थिनींची प्राप्त प्रवेश अर्जांतून निवड केली. त्यानंतर एकत्रित बैठक घेवून रा.से.यो. ची उद्दिष्टे व वर्षभर राबवायचे उपक्रम यांबाबत प्रा. गणपत नवले, कार्यक्रम अधिकारी यांनी प्रबोधन केले. प्रत्येक पंधरवाड्यातून एकदा एकत्र येऊन महाविद्यालय परिसराची स्वच्छता करण्याचे धोरण निश्चित केले. नियमित उपक्रमाअंतर्गत खालील उपक्रम राबविण्यात आले.

१) परिसरातील स्वच्छता केली.  २) महाविद्यालय परिसरातील स्वच्छता केली.

३) झाडांचे व्यवस्थित संगोपन केले.

या शिवाय स्त्री-भ्रुणहत्या विरोधी जनजागरण मोहिमेत सक्रीय सहभाग घेऊन गावात 'स्त्री जन्माचे स्वागत करा.' हा सामाजिक संदेश दिला. १ डिसेंबर रोजी सकाळी ग्रामिण रूग्णालय अकोले आयोजित एड्स जनजागृती मोहिमेअंतर्गत आयोजित प्रचार रॅलीत सक्रीय सहभाग घेऊन एड्स ग्रस्तांना सन्मानाने वागविण्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांनी शपथ घेतली.

अगस्ती आश्रम, अकोले या ठिकाणी 'अधिक मासानिमित्त' आयोजित सप्ताह सांगता प्रसंगी हजारो भाविकांना महाप्रसाद

वाढण्याचे सहकार्य केले. प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन निवड शिबीर (P.R.D. Camp.) मॉडर्न विद्यालय पुणे येथे सप्टेंबर मध्ये संपन्न झालेल्या शिबीरात पुणे विभागातून कनिष्ठ महाविद्यालातील १ विद्यार्थी व १ विद्यार्थीनी यांनी सक्रीय सहभाग घेवून अनुक्रमे तृतीय क्रमांक प्राप्त केला. ते खालील प्रमाणे -

आमचा सन्मान - कु. देशमुख सोनाली राजेंद्र - इ. ११ वी कला - सक्रीय सहभाग

श्री. धुमाळ राहूल राजेंद्र - इ. ११ वी कला - सक्रीय सहभाग.

तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबीर दि. ५/१/२०१३ ते ११/१/२०१३ या कालावधीत अगस्ती आश्रम येथे संप्पन्न झाले. शिबीरात शिवार फेरी, माती परीक्षण, वृक्षारोपण, क्षेत्रभेट, श्रमसंस्कार, व्यक्तिमत्त्व विकास, स्वावलंबन, प्रबोधन, सांस्कृतिक गुणांचा विकास, इ. उपक्रम आयोजित केले होते. शिबीरात विविध सामाजिक विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली होती. एकूण ८५ विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. व्यक्तिमत्त्व विकासासाठी स्वावलंबन ही गुरूकिल्ली आहे हे पटवून देण्यात आले. उत्कृष्ट सहभागावर आधारित खालील आदर्श स्वयंसेवकांची निवड करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना - नियमित उपक्रमांतर्गत 'एक दिवशीय कार्यशाळा' घेण्याचे आयोजन आहे.

वर्षभर राष्ट्रीय सेवा योजना युनिट समक्षपणे चालविण्यासाठी व विशेष हिवाळी शिबीर यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी प्रा. गणपत नवले - कार्यक्रम अधिकारी प्रा. बाळासाहेब पवार, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, प्रा. आनंद चौधरी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी व प्रा. मोहिनी शिंदे कार्यरत आहेत. यासाठी प्राचार्य रमेशचंद्र खांडगे व उपप्राचार्य प्रा. आत्माराम काळे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

* * *

**वादविवाद मंडळ - (अध्यक्ष : प्रा. सतीश काळे)**

वादविवाद मंडळामार्फत वर्षभरात विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांसाठी पाठविण्यात आले.

- रूथबाई हिवाळे स्मृती करंडक स्पर्धा, अहमदनगर येथे कु. वर्षा रमेश वाकचौरे १२ वी या मुलीने उत्तेजनार्थ बक्षीस मिळविले.
- कालकथित दादासाहेब रूपवते वक्तृत्व स्पर्धा घुलेवाडी, संगमनेर येथे संपन्न झाली. या स्पर्धेत कु. वर्ष रमेश वाक्चौरे या विद्यार्थीनीने मोठ्या गटात द्वितीय क्रमांक मिळविला. रू. ४०० चे रोख बक्षीस स्मृती चिन्हासह मिळविले.
- जीवदया प्रतिष्ठान, निंब्रळ, सौरभ ग्रामविकास प्रतिष्ठान अकोले इ. ठिकाणी विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले.

वार्षिक स्नेहसंमेलना निमित्त वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. प्रा. महेश पाडेकर यांनी सहकार्य केले.

वार्षिक स्नेहसम्मेलनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा घेतल्या.

* * *

**परीक्षा विभाग - (चेअरमन : प्रा. ओंकार राठी)**

शैक्षणिक वर्षात विभागाने मध्यसत्र (इ. १२ वी साठी), सहामाही (इ. ११वी व १२वी साठी) व भाषा विषयांसाठी तोंडी परीक्षा, विज्ञान व भूगोल विषयांसाठी प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या. इ. १२वी साठी सराव परीक्षा (फॉर्म परीक्षा) घेण्यात आली. इ. ११वी ची वार्षिक परीक्षा एप्रिल च्या पहिल्या आठवड्यात घेण्याचे नियोजन आहे.

परीक्षा विभागाचे प्रमुख प्रा. ओंकार राठी यांना सर्व प्रकारच्या परीक्षा घेण्यासाठी प्रा. तानाजी जाधव, प्रा. सुधीर राक्षे, प्रा. विकास निमसे, प्रा. वसंत पवार, प्रा. सचिन बिबवे, प्राध्यापिका रूपाली रासने प्राध्यापिका मनिषा घोलप यांनी सहकार्य केले.

* * *

**सहल विभाग - (अध्यक्ष : प्रा. वाकळे डी. एम.)**

शैक्षणिक वर्षात कला विभागाची शैक्षणिक सहल कोकण दर्शनासाठी (अकोले - पुणे - हरिहरेश्वर - जंजिरा - महाबळेश्वर - पुणे - रायगड - अकोले) आयोजित करण्यात आली.

कोकण दर्शन सहलीसाठी एकूण ४५ विद्यार्थी सहभागी झाले, सोबत ४ सहकारी प्राध्यापकांचा समावेश होता. दि. २२/१२/२०१२ ते २४/१२/१२/२०१२ या कालावधीत सहल अतिशय आनंददायी वातावरणात पार पडली. सहल विभाग प्रमुख प्रा. वाकळे यांना प्रा. कानवडे, प्रा. चासकर, प्रा. साबळे व प्रा. रोहिणी डावरे यांचे सहकार्य मिळाले.

* * *

**विज्ञान मंडळ - (अध्यक्ष : प्रा. संजय लांडगे ) -** शैक्षणिक वर्षात मंडळामार्फत 'निबंध स्पर्धा', 'विज्ञान बुद्धीमत्ता चाचणी' शिर्डी येथिल साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयातर्फे आयोजित 'Quiz contest' मध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग, विज्ञान विषयक लेखांचे विद्यार्थ्यांसाठी वाचन, विज्ञान विषयक भित्ती पत्रकांचे प्रदर्शन इ. उपक्रम घेण्यात आले.
सदस्य - प्रा. शिवराम शिंदे व प्रा. महेश उगले यांनी वर्षभर विज्ञान मंडळाचे काम पाहिले.

* * *

**पर्यावरण शिक्षण व प्रकल्प कार्य विभाग - (अध्यक्ष : प्रा. ऋषिकेश कानवडे )**
विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरण विषयक जाणीव जागृती करण्यात आली. विविध पर्यावरण प्रकल्पांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पश्चिम घाट विकास कार्यक्रमांअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव निर्माण करण्यात आली. या वर्षापासून 'Eco-club' ची स्थापना करण्यात आली.

मा. बसवंत सरांचे व्याख्यान इयत्ता ११वी साठी आयोजित केले गेले. विभागास प्रा. नंदा डफाळ यांचे सहकार्य मिळाले.

* * *

**वेळापत्रक समिती - अध्यक्ष - प्रा. अशोक कडलग -** वर्ष २०१२-१३ साठी कनिष्ठ महाविद्यालयाच्या १४ अनुदानित व ४ विनाअनुदानित वर्गाचे, प्रत्येक वर्गाचे सात तासिकांचे सर्व विषयांचे वेळापत्रक तयार करण्यात आले. या कामी प्रा. ओंकार राठी यांनी सहकार्य केले.

* * *

**ग्राहक भांडार - (अध्यक्ष : प्रा. डी.एम. वाकळे )**
सन १९७७ पासून कार्यरत असणारे अकोले कॉलेज विद्यार्थी सह. भांडार हे महाविद्यालय परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य व सतत लागणारी आवश्यक स्टेशनरी रास्त दराने उपलब्ध करून देणारे एकमेव ग्राहक केंद्र असून मागील वर्षी या भांडाराला ऑडीट वर्ग 'अ' प्राप्त झाला आहे. अ.ता.ए.सो.चे सेक्रेटरी, अध्यक्ष व सर्व पदाधिकारी व महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, उपप्राचार्य ए. एम. काळे, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विविध विभागांचे प्रमुख व्हा. चेअरमन मा. सी. आर. ढवळे, प्रा. एस. के. मालुंजकर, प्रा. जी.एन. लांडगे, प्रा. जी.जे. नवले, प्रा. व्ही. व्ही. वाक्चौरे, सचिव प्रा. व्ही. एन. निमसे यांचे सह सर्वांचे तसेच विद्यार्थी/विद्यार्थिनींचे चांगल्याप्रकारचे सहकार्य मिळाले.

* * *

**नियतकालिक विभाग - (अध्यक्ष : प्रा. डॉ. सुनील शिंदे )**
नियतकालिकासाठी शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांकडून साहित्य प्राप्त झाले असून विगतवारीसह संपादन कार्य प्रगतीपथावर आहे. प्रा. जी.डी. लांडगे, प्रा. रोहिणी डावरे यांचे विभागास सहकार्य लाभले.

* * *

## **प्रवेश परीक्षा** (CET) **व उन्हाळी वर्ग** (Vaccation) **समिती**

**(चेअरमन : प्रा. चांगदेव डोंगरे) (सदस्य : प्रा. भिमाजी पळसकर, प्रा. संभाजी गायकवाड)**

**उन्हाळी वर्ग** (Vaccation) **समिती -** 'अगस्ती पॅटर्न'चे या वर्षी देखील यशस्वी आयोजन करण्यात आले. दि. १६ एप्रिल २०१२ पासून १२ वी विज्ञान वर्गाच्या उन्हाळी वर्गांचे आयोजन करण्यात आले. दि. १६ एप्रिल २०१२ पासून १२ वी विज्ञान वर्गाच्या उन्हाळी वर्गांचे आयोजन करण्यात आले. CBSE धोरणानुसार उच्चीकृत (upgrade) केलेल्या अभ्यासक्रमानुसार नवीन शैक्षणिक धोरणानुसार नियोजन करून वेळेवर अभ्यासक्रम १००% पूर्ण केला.

सप्टेंबर महिन्यात पालक मेळाव्याचे यशस्वी आयोजन मा. अध्यक्ष जे.डी. आंबरे पाटील व सेक्रेटरी, मा. यशवंत आभाळे, प्राचार्य यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आले. पालक मेळाव्यात निकालाचे बदलते निकष, अभ्यासक्रमाचे स्वरूप, काठीण्य पातळी, निकाल या संदर्भात चर्चा करण्यात आल्या. वारंवार घेतलेल्या परीक्षांच्या निकालाचा प्रत्यक्ष पालक व विद्यार्थी यांच्या बरोबर संवाद करून निकाल वाढविण्यासंदर्भात सूचना दिल्या. उन्हाळ्यामध्ये, दिवाळीच्या, नाताळच्या सुट्टीमध्ये जादा तासांचे नियोजन केले.

**प्रवेश परीक्षा** (CET) - या विभागामार्फत मेडिकल व इंजिनिअरींग NEET व JEE या परीक्षांबाबतची सर्व माहिती प्रवेश अर्ज भरण्यापासून ते परीक्षा देण्या संदर्भात योग्य ते मार्गदर्शन वर्षभर केले जाते. शासनाच्या बदललेल्या धोरणांनुसार MHT-CET च्या ऐवजी देशपातळीवर मेडीकलसाठी NEET व इंजिनिअरींगसाठी JEE व फक्त यावर्षी MT-CET चे आयोजन केले जाणार आहे. त्यादृष्टीने योग्य त्या ''मार्गदर्शक वर्गाचे'' आयोजन दरवर्षी केले जाते.

मे २०१२ मध्ये झालेल्या MHT-CET परीक्षेसाठी महाविद्यालयातून विद्यार्थी बसले. त्यापैकी काही विद्यार्थी महाविद्यालयाच्या नियमित मार्गदर्शन वर्गासाठी उपस्थित होते. लांडगे गोकुळ देवराम हा विद्यार्थी PCM ग्रूपसाठी १३९ गुण मिळवून महाविद्यालयात सर्वप्रथम आला. तसेच अभिनय बुधाजी लहामटे PCB ग्रूपसाठी १२७ गुण मिळवून महाविद्यालयात सर्वप्रथम आला.

सर्वच विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयामध्ये (शासकीय/निमखाजगी) प्रवेश मिळाले आहेत व मेडीकल इंजिनिअरींगसाठीची यशस्वी परंपरा पुढे चालू आहे.

पुणे येथील DEPPER ही संस्था महाराष्ट्र शासनाच्या CET च्या धर्तीवर व NEET, JEE सारखी परीक्षांचे आयोजन करते. यामध्ये DCT-2013 व कसोटी - २०१३ यांचे आयोजन असते. दि. ६ जानेवारी २०१३ रोजी DCT-2013 चे आयोजन करण्यात आले. तालुक्यातून आपल्या केंद्रावर १३२ विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये ११७ विद्यार्थी आपल्या महाविद्यालयाचे होते. एप्रिल २०१३ मध्ये DEPPER तर्फे NEET व JEE चे आयोजन करण्यात येणार आहे.

DEPPER परीक्षेचा विद्यार्थ्यांना फायदा होतो व अंतिम परीक्षा विद्यार्थी तणावमुक्त पद्धतीने देतो. या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा सराव होतो. विद्यार्थ्यांना परीक्षा पद्धत समजावण्यास मदत होते. या विभागामार्फत सर्व परीक्षांची माहिती Online फॉर्म भरणे, लागणारे कागदपत्रे, परीक्षांमधीलबदल ही सर्व माहिती वेळच्या वेळी विद्यार्थ्यांना दिली जाते.

निकाल लागल्यानंतर ॲडमिशन कोठे? कोणत्या कॉलेजला? कोणत्या ट्रेडसाठी खाजगी / शासकीय कोट्यामधून प्रवेश मिळेल याची माहिती Preference फॉर्म कसा द्यावा याची देखिल माहिती IT विभागाच्या सहकार्याने प्रा. विवेक वाक्चौरे व सहकारी करतात.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बोर्ड परीक्षा संपल्यानंतर MHT-CET, JEE व NEET या सर्व परीक्षांसंदर्भात पूर्णवेळ 'कॅश कोर्सचे' आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे मेडीकल व इंजिनिअरींगचे अत्यल्प फी मध्ये प्रवेशाचे स्वप्न येथेच साकार होत असल्यामुळे शहरामध्ये जाण्याचा त्रास वाचतो. वेळ व पैसा याची बचत होते.

वरील सर्व उपक्रमांमध्ये प्रा. बाबासाहेब शेवाळे, प्रा. अशोक कडलग, प्रा. संजय लांडगे, प्रा. विवेक वाक्चौरे, प्रा. बाळासाहेब गोर्डे, प्रा. सौ. घोलप, प्रा. सतीश काळे, प्रा. गुलाब देशमुख, प्रा. शिरीष डावखर यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

* * *

**वाणिज्य मंडळ - (अध्यक्ष : प्रा. बापूसाहेब आवारी)**

वाणिज्य मंडळाचे उद्घाटन महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी मा.श्री. गिरीश पटवा सनदी लेखापाल (CA) पुणे यांचे हस्ते मा. उपप्राचार्य आत्माराम काळे यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले.

मंडळामार्फत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करण्यात आले. त्या अंतर्गत 'कौन बनेगा ज्ञानपती' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या शिवाय परीसर स्वच्छता इ. प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले. वाणिज्य मंडळास मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, मा. उपप्राचार्य आत्माराम काळे मा. पर्यवेक्षक प्रा. सखाराम चासकर सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल वाणिज्य मंडळ त्यांचे आभारी आहे. मंडळाचे सचीव म्हणून प्रा. अनिल धीवर यांनी काम पाहिले. प्रा. आनंदराव चौधरी व प्रा. विकास निमसे यांनी मोलाचे सहकार्य केले.

* * *

**वाङ्मय मंडळ - (अध्यक्ष : प्रा. देवीदास चौधरी) -** मंडळातर्फे वर्षभरात निबंध लेखन, कथा लेखन, काव्य लेखन या स्पर्धा घेण्यात आल्या. वाङ्मय मंडळ कार्यक्रमाच्या आयोजनासाठी व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. प्रदीप बराते व प्रा. सुधीर राक्षे यांचे सहकार्य लाभले.

* * *

**शिस्त समिती - (अध्यक्ष : प्रा. गणपत नवले) -** विद्यार्थ्यांमध्ये शिस्त राखून त्यांना शिस्तीचे महत्व जाणून देण्यासाठी शिस्त समिती सतत प्रयत्नशील आहे. वर्गात व महाविद्यालयात मोबाईल सापडल्यास जप्त करून दंडात्मक कारवाई केली जाते, समस्यांचे निराकरण केले जाते.

शिस्तीमुळे ध्येयापर्यंत पोहचता येते. हे विद्यार्थ्यांना पटवून देण्याचा प्रयत्न असतो. यासाठी उपप्राचार्य आत्माराम काळे यांचा भक्कम पाठिंबा व सक्रीय सहभाग आहे त्याकरिता प्रा. जी. एन. लांडगे, प्रा. जी के हासे, प्रा. बी.एम. गोर्डे, प्रा. एम.जी.उगले, प्रा. निमसे, प्रा.चौधरी, प्रा. सौ. अंजना नवले, प्रा.सौ. पळसकर, प्रा. मोहिनी शिंदे यांचे सक्रीय सहकार्य लाभले.

* * *

**विद्यार्थिनी - आरोग्य विभाग (समन्वयक : प्रा.सौ. नवले अंजना) (सदस्या : प्रा.सौ. धोलप मनिषा)**

या योजनेअंतर्गत चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच डॉ.सौ. अर्चना खताळ यांनी विद्यार्थिनींना आरोग्य संवंर्धनाकरिता व संरक्षणाबाबत योग्य त्या सुचना व मार्गदर्शन केले. या कामी प्रा.सौ. मनिषा घोलप यांचे सहकार्य लाभले.

* * *

**आमचा मान आमचा सन्मान**

**प्रा. रोहिणी डावरे** (हिन्दी विभाग)

सप्टेंबर २०१२ मध्ये प्रथम श्रेणीत एम.फिल पदवी प्राप्त झाली. 'रेखाचित्र' या साहित्य प्रकारावर अध्ययन करून 'महादेवी वर्मा के रेखाचित्रः एक अनुशीलन' या विषयावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने डॉ. अशोक धुलधुले हिंदी विभाग प्रमुख-बिटको कॉलेज नाशिक रोड (समन्वयक-पुणे विद्यापीठ रिसर्च सेंटर) नाशिक रोड यांच्या मार्गदर्शनाखाली एम्. फिल पदवी प्राप्त झाली.

* * *

# विशेष उपक्रम अहवाल

सन २०१२-१३

# विशेष उपक्रम अहवाल

सन २०१२-१३

विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ

व

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

ता. अकोले- ४२२ ६०१ जि. अहमदनगर आयोजित,

## निर्भय कन्या अभियान

दि. १२ जानेवारी २०१३

# अहवाल

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे, अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले ता. अकोले- ४२२ ६०१ जि. अहमदनगर यांनी विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी निर्भय कन्या अभियानाचे दि. १२ जानेवारी २०१३ या दिवशी यशस्वीपणे राबविले. या अभियानामध्ये गटातील महाविद्यालये व यजमान महाविद्यालयातील अशा एकूण २११ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. गटातील संत कोंडाजीबाबा कला व वाणिज्य महाविद्यालय, कोतुळ, ता. अकोले, जि. अहमदनगर, कला व वाणिज्य महाविद्यालय, शेंडी, (भंडारदरा डॅम) ता. अकोले, जि. अहमदनगर, ॲड. मनोहरराव नानासाहेब देशमुख, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजुर, ता. अकोले, जि. अहमदनगर या महाविद्यालयातील विद्यार्थिनी सहभागी झाल्या. शिबिरार्थींना मा. श्रीमती अंजनाताई बाजीराव बोंबले सभापती, अकोले पंचायत समिती, अकोले जि. अहमदनगर, अकोले येथील प्रख्यात समाजसेविका व वकील ॲड. सौ. मंगलताई हांडे यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. तसेच अकोले येथील कराटे प्रशिक्षक श्री. सुभाष मेंढे यांनी या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे दिले व प्रात्यक्षिके करून घेतली. शकतीपेक्षा युक्तीचा वापर करून अत्याचारी व्यक्तिचा सामना करण्याचे प्रशिक्षण या अभियानाद्वारे श्री. सुभाष मेंढे यांनी विद्यार्थिनींना दिले.

अभियानाच्या दिवशी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत शिबिरार्थींचे रजिस्ट्रेशन झाल्यानंतर १०.०० वाजता शिबिराचे उदघाटन मा. श्रीमती अंजनाताई बाजीराव बोंबले

सभापती, अकोले पंचायत समिती, अकोले जि. अहमदनगर यांनी केले. या कार्यक्रमासाठी ॲड. सौ. मंगलताई हांडे हे अध्यक्ष लाभले. या उपक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य रमेशचंद्र खांडगे म्हणाले की, एकंदरीत सभोवतालची सामाजिक परिस्थिति पाहता आता मुलींनी स्वत:चे संरक्षण स्वत:च करण्याची वेळ आलेली आहे. विशेषत: शिक्षण घेत असताना विद्यार्थिनिंमध्ये स्वसंरक्षणाची जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने शास्रोक्त प्रशिक्षणाची गरज या प्रकारच्या अभियानाने पुरविली जाईल. आपले शिक्षण घेत असताना युवतींना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते आणि या संकटांचा निर्भयपणे व समर्थपणे सामना करत मुलींनी आपले शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी बनले पाहिजे व भविष्यात शेतीपासून तर कोणत्याही मोठ्या व्यवसायापर्यंत मजल मारली पाहिजे म्हणून शिक्षणाच्या या प्रवासादरम्यान निर्भय बनण्यासाठी हे अभियान उपयोगी ठरेल असे मत श्रीमती बोंबले यांनी मांडले. तसेच दैनंदिन जीवन जगत असताना अनेक दुखा:ना सामोरे जावे लागते, अशा वेळी सोशीकता, संयम आणि खंबीर वृत्ती यांच्या आधारे आपण आपले जीवन यशस्वी करु शकतो याची जाणीव त्यांनी मुलींना करून दिली. ॲड. सौ. मंगलताई हांडे यांनी मनोगत व्यक्त करताना सध्या संपुर्ण देशात विविध ठिकाणी चाललेल्या महिलांवरील अत्याचाराचा उल्लेख करून सांगितले की, अगदी आपल्या जवळपास, आपल्या गावात जर एखाद्या महिलेवर काही अत्याचार होत असेल तर त्याचा महिलांनीच ताबडतोब निषेध करून आवाज उठविला पाहिजे. महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या ज्या नोंदी होतात त्याच फक्त आपल्याला माहीत होतात. बहूतेक अत्याच्याराच्या बातम्या ह्या बाहेर येतही नाही. याचा अर्थ नोंदी नसलेल्या अत्याचारांचीही संख्या प्रचंड असते परंतु महिला आपल्यावर होणारे अत्याचार सांगत नाहीत किंवा बोलत नाहीत. म्हणून महिलांनी स्वत: सक्षम बनले पाहिजे व स्वत:चे व्यक्तिमत्व स्वत: बनविले पाहिजे. स्वत:चे व्यक्तिमत्व घडविणे व स्वत:चे संरक्षण करणे यासाठी स्वत: प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण घेतले पाहिजे. निव्वळ रली काढून व कायदे करून हा प्रश्न मिटणार नाही तर यासाठी प्रत्येक महिलेने निर्भय बनणे आवश्यक आहे. तसेच आपल्या मुला-मुलींवर चांगल्या प्रकारचे संस्कार केले पाहिजे असे प्रतिपादन ॲड. सौ. मंगलताई हांडे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले.

कराटे प्रशिक्षक श्री. सुभाष मेंढे यांनी या शिबिरामध्ये सहभागी झालेल्या दोनशेपेक्षा अधिक विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे दिले व प्रात्यक्षिके करून घेतली. शकतीपेक्षा युक्तीचा वापर करून अत्याचारी व्यक्तिचा सामना करण्याचे प्रशिक्षण या अभियानाद्वारे देण्यात आले.

या अभियानाचे संयोजन प्रा. सौ. महेजबिन सययद व प्रा, सौ. रंजना कदम यांनी केले या कार्यक्रमास ज्येष्ठ प्रा. सौ. अकीला शेख, विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय भगत, डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रा. घनकुटे, प्रा. वाघमारे, प्रा. कु. भोर, प्रा. कु. खडामकर यांचे मार्गदर्शन लाभले. हे अभियान विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ व अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे, अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले ता. अकोले- ४२२ ६०१ जि. अहमदनगर यांनी संयुक्तपणे राबविला. यासाठी विद्यार्थी कल्याण मंडळाचे अध्यक्ष प्रा. अशोक दातीर यांनी समन्वयकाची भूमिका पार पाडली. संध्याकाळी ५.०० वाजता पारितोषिक वितरणाने अभियानाची सांगता झाली.

(अशोक दातीर)
विद्यार्थी कल्याण अधिकारी,
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते
विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि.अहमदनगर

विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ

व

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे,

अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

ता. अकोले- ४२२ ६०१ जि. अहमदनगर आयोजित,

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर

दि. २७ व २८ डिसेंबर २०१२

## अहवाल

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे, अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले ता. अकोले- ४२२ ६०१ जि. अहमदनगर यांनी विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे दि. २७ व २८ डिसेंबर २०१२ या दोन दिवशी यशस्वीपणे राबविले. या शिबीरामध्ये गटातील महाविद्यालये व यजमान महाविद्यालयातील अशा एकूण १३१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. गटातील संत कोंडाजीबाबा कला व वाणिज्य महाविद्यालय, कोतुळ, ता. अकोले, जि. अहमदनगर, कला व वाणिज्य महाविद्यालय, शेंडी, (भंडारदरा डॅम) ता. अकोले, जि. अहमदनगर, नूतन महाविद्यालय, राजापूर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर, अॅड. मनोहरराव नानासाहेब देशमुख, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजुर, ता. अकोले, जि. अहमदनगर या महाविद्यालयांनी या शिबीरासाठी निवडक विद्यार्थी पाठवले. शिबिरार्थींना मा. राजेंद्र रहाणे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर, प्रा. मधुसूदन दिवेकर, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर, श्री. विजय पवार, श्री. अमित गायकवाड तसेच अकोले महाविद्यालयातील आपत्ति व्यवस्थापन कक्ष यांचे मार्गदर्शन लाभले. आपत्कालीन संभाव्य परिस्थितीमध्ये जिवीत वा वित्त हानी टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजनाचे प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन हे उद्दिष्ट ह्या शिबिरामध्ये प्रामुख्याने ठेवण्यात आले होते.

शिबीराच्या पहिल्या दिवशी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत शिबिरार्थींचे रजिस्ट्रेशन झाल्यानंतर १०.०० वाजता शिबिराचे उद्घाटन मा. राजेंद्र रहाणे, कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचे हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे (अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी) खजिनदार मा. ॲड. के. बी. हांडे हे अध्यक्ष लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. रमेशचंद्र खांडगे यांनी प्रास्ताविकात पुणे विद्यापीठाने सुरू केलेल्या या उपक्रमाचे सध्याच्या परिस्थितीमधील महत्व विशद केले. या संपूर्ण शिबिरामध्ये महाविद्यालयाचा विद्यापीठ प्रतिनिधी श्री. प्रशांत आंबरे ह्याचा सक्रिय सहभाग जाणवला.

सकाळच्या सत्रात मा. राजेंद्र रहाणे यांनी आपल्या व्याख्यानाद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले की, जीवनात येणाऱ्या कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीमधून सुखरूप बाहेर पडण्यासाठी प्रथमतः आपल्या शरीराचे व मनाचे आरोग्य सधृढ असणे आवश्यक आहे व तसे असेल तरच मनुष्य योग्य, अचूक व जलदतेने अशी परिस्थिती हाताळू शकतो. या सत्रात मा. प्रा. मधुसूदन दिवेकर, संगमनेर महाविद्यालय, संगमनेर यांनी आपल्या "सर्पांच्या विश्वात" या तीन टप्प्यांमधील व्याख्यानात सर्पाविषयक माहिती दिली व प्रात्यक्षिकांद्वारे शिबिरार्थ्यांच्या मनातील सापाविषयीची भीती दूर केली. तसेच विषारी सापांपासून असणारे धोके व घ्यावयाची काळजी स्पष्ट केली.

दुपारच्या सत्रात प्रशिक्षक श्री. विजय पवार व समूहाने व्याख्यान व प्रात्यक्षिकांद्वारे आपती व आपतींचे प्रकार, भूकंप, त्सुनामी, आपत्तीपुर्व व आपत्तीनंतरचे व्यवस्थापन, टाइप्स ऑफ नॉट्स, आपतग्रस्त व्यक्ति, स्ट्रेचर चे प्रकार इत्यादि आपत्कालीन परिस्थितीमध्ये नेहमी महत्वाच्या ठरणाऱ्या बाबींबाबत शिबिरार्थ्यांकडून प्रात्यक्षिके करवून घेतली.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात श्री. विजय पवार व महाविद्यालयाच्या आपत्कालीन कक्षाने प्रवरा नदीमध्ये पाणी व पूर आपत्कालीन व्यवस्थापनाची प्रात्यक्षिके दाखवली व सहज उपलब्ध असलेल्या साधनांच्या द्वारे पाणी व पूर आपत्कालीन परिस्थितिचे व्यवस्थापन कसे करावे याचे शिबिरार्थिंना प्रत्यक्ष सहभागी करून मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात अग्निशमन यंत्रणा माहिती व आग-आपत्कालीन व्यवस्थापन या विषयावर प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. या कामी अगस्ति सहकारी साखर कारखाना, अकोले यांची मदत घेण्यात आली. तसेच श्री. अमीत गायकवाड, अकोले यांचे सर्पदंशानंतरचे प्रथमोपचार या विषयावरील कार्यशाळेद्वारे मार्गदर्शन झाले व संध्याकाळी ५.०० वाजता शिबिरार्थ्यांची मनोगते व पारितोषिक वितरणाने शिबिराची सांगता झाली.

अशोक दातीर
विद्यार्थी कल्याण अधिकारी,
अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते
विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर

# अ) वरिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक वृंद

| अ.नं. | नांव | हुद्दा | विषय | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १) | प्रा. रमेशचंद्र खांडगे | प्राचार्य | इंग्रजी | एम्.ए., बी.एड्. |
| २) | डॉ. बाणकर व्ही. के. | विभाग प्रमुख | तत्वज्ञान | एम्.ए., पीएच्.डी. |
| ३) | प्रा. महाले बी. एम. | विभाग प्रमुख | मराठी | एम्.ए. |
| ४) | प्रा. शिंदे बी. आर | विभाग प्रमुख | अर्थशास्त्र | एम्.ए., बी.एड्. |
| ५) | प्रा. डॉ. सौ. शेख ए. एम्. | विभाग प्रमुख | हिंदी | एम्.ए., बी.एड्., एम्.फिल., पीएच्.डी. |
| ६) | प्रा. केदार ए. ए. | विभाग प्रमुख | राज्यशास्त्र | एम्.ए., बी.एड्., एम्.फिल. |
| ७) | प्रा. पगारे एस. बी. | सहयोगी प्राध्यापक | इंग्रजी | एम्.ए., पी.जी.डी.टी.ई. |
| ८) | प्रा.डॉ. ताकटे एस. बी. | विभाग प्रमुख | रसायनशास्त्र | एम्.एस्सी., पीएच्.डी. |
| ९) | प्रा. मेहेत्रे बी.डी. | विभाग प्रमुख | गणित | एम्.एस्सी., पीएच्.डी. |
| १०) | प्रा. नाईकवाडी के.बी. | विभाग प्रमुख | प्राणिशास्त्र | एम्.एस्सी., डी.एच्.ई. |
| ११) | प्रा. डॉ. देशमुख बी. एस. | विभाग प्रमुख | वनस्पतीशास्त्र | एम्.एस्सी., एम्.फिल.पीएच्.डी. |
| १२) | प्रा. भाटे ए.टी. | विभाग प्रमुख | पदार्थ विज्ञान | एम्.एस्सी., डी.एच.ई. एम.एड्. |
| १३) | प्रा. मालुंजकर एस. के. | सहयोगी प्राध्या. | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. |
| १४) | प्रा. भांगरे बी. के. | सहयोगी प्राध्या. | वनस्पतीशास्त्र | एम्. एस्सी. |
| १५) | प्रा. डॉ. झांबरे ए.पी. | सहयोगी प्राध्या. | पदार्थविज्ञान | एम्. एस्सी., पीएच्.डी. |
| १६) | प्रा. बाणाईत एम. डी. | सहयोगी प्राध्या. | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. |
| १७) | प्रा.डॉ. दातीर ए. एम. | सहयोगी प्राध्या. | पदार्थविज्ञान | एम्. एस्सी., पीएच्.डी. |
| १८) | प्रा. गायकवाड एस. एस. | सहयोगी प्राध्या. | हिंदी | एम्.ए. |
| १९) | प्रा. डॉ. सोनवणे एस. एम. | सहयोगी प्राध्या. | रसायनशास्त्र | एम्. एस्सी., पीएच्.डी. |
| २०) | प्रा. डॉ. खेमनर एस. बी. | विभाग प्रमुख | भूगोल | एम.ए., बी.एड्. पीएच्.डी. |
| २१) | प्रा. सौ. हांडे एम. के. | सहाय्यक प्राध्या. | वाणिज्य | बी.ए., एल्.एल्.बी. |
| २२) | प्रा. देशमुख बी. बी. | सहाय्यक प्राध्या. | इंग्रजी | एम्.ए. |
| २३) | प्रा. डॉ. शेडगे व्ही. एस. | सहाय्यक प्राध्या. | तत्त्वज्ञान | एम्.ए.पीएच्.डी. |
| २४) | प्रा. सय्यद वाय. जी. | विभाग प्रमुख | राज्यशास्त्र | एम्.ए., एम्.फिल्. |
| २५) | प्रा. साळवे एस. व्ही. | सहाय्यक प्राध्या. | इंग्रजी | एम्. ए. |
| २६) | प्रा. जाधव के. एस. | विभाग प्रमुख | इतिहास | एम्.ए. (सेट अॅण्ड नेट) |
| २७) | प्रा. डॉ. भगत व्ही. एस. | सहाय्यक प्रा. | भूगोल | एम्.ए., पीएच्.डी. |
| २८) | प्रा. पाळंदे एस. ए. | विभाग प्रमुख | वाणिज्य | एम्. कॉम. (सेट) |
| २९) | प्रा. वाघमारे आर. के. | सहाय्यक प्राध्या. | वनस्पतीशास्त्र | एम्.एस्सी., एम्. फिल. |
| ३०) | प्रा. सौ. कदम आर. एम. | सहाय्यक प्राध्यापिका | मराठी | एम्.ए. (नेट) |
| ३१) | प्रा. भोसले आर. आर. | संचालक शारीरिक शिक्षण | क्रीडा विभाग | एम्.पी.एड्. |
| ३२) | प्रा. बच्छाव पी. जे. | ग्रंथपाल | | एम.ए. एम. लिब (नेट) |

## ब) कनिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक वृंद

| अ.नं. | नांव | हुद्दा | विषय | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १) | प्रा. काळे ए.एम. | उपप्राचार्य | इंग्रजी | एम्.ए., बी.एड्. |
| २) | प्रा. चासकर एस. टी. | पर्यवेक्षक | इंग्रजी | एम्.ए., बी.एड्. |
| ३) | प्रा. लांडगे जी. एन. | पर्यवेक्षक | मानसशास्त्र | एम्.ए., डी.एच्.ई.एम.फिल. |
| ४) | प्रा. हासे जी. के. | सहाय्यक शिक्षक | अर्थशास्त्र | एम्.ए., डी.एच्.ई. |
| ५) | प्रा. वाकळे डी.एम. | सहाय्यक शिक्षक | भूगोल | एम्.ए., डी.एच्.ई. |
| ६) | प्रा. जगताप पी.आर. | सहाय्यक शिक्षक | राज्यशास्त्र | एम्.ए., बी.एड्. |
| ७) | प्रा. डॉ. शिंदे एस.बी. | सहाय्यक शिक्षक | मराठी | एम्.ए., बी.एड्. पीएच्.डी. |
| ८) | प्रा. फापाळे ए. एन. | सहाय्यक शिक्षक | राज्यशास्त्र | एम्.ए., डी.एच्.ई. |
| ९) | प्रा. काळन एन. पी. | शारीरिक शिक्षण | संचालक-क्रीडा | एम्.कॉम्., एम्.बी.एड्. |
| १०) | प्रा. राठी ओ. एस. | सहाय्यक शिक्षक | मराठी | एम्.ए., बी.एड्. |
| ११) | प्रा. शेटे बी. पी. | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम्.ए., बी.एड्. |
| १२) | प्रा. पळसकर बी. एच. | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम्.एस्सी., बी.एड्. |
| १३) | प्रा. शेवाळे बी. एस. | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| १४) | प्रा. चौधरी डी. एम. | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम्.ए., बी.एड्. |
| १५) | प्रा. कडलग ए. डी. | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| १६) | प्रा. नवले जी. के. | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम्.ए., बी.एड्. |
| १७) | प्रा. पवार बी. के. | सहाय्यक शिक्षक | इतिहास | एम्.ए., बी.एड्. |
| १८) | प्रा. जाधव टी. एस. | सहाय्यक शिक्षक | भूगोल | एम्.ए., बी.एड्. |
| १९) | प्रा. गायकवाड एस. ए. | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| २०) | प्रा. लांडगे एस. ए. | सहाय्यक शिक्षक | गणित | एम्.एस्सी., बी.एड्. |
| २१) | प्रा. डोंगरे सी.एम. | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| २२) | प्रा. वाकचौरे व्ही. व्ही. | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम्.एस्सी., बी.एड्. |
| २३) | प्रा. राक्षे एस. व्ही. | सहाय्यक शिक्षक | मराठी | एम्.ए., बी.एड्. |
| २४) | प्रा. मालुंजकर एस. ई. | सहाय्यक शिक्षक | भूगोल | एम्.ए., बी.एड्. |
| २५) | प्रा. गोर्डे बी. एम. | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम्.एस्सी., बी.एड्. |
| २६) | प्रा. कर्पे आर. बी. | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| २७) | प्रा. उगले एम. जी. | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| २८) | प्रा. शिंदे एस. डी. | सहाय्यक शिक्षक | पदार्थविज्ञान | एम्.एस्सी., बी.एड्. |
| २९) | प्रा. देशमुख जी. बी. | सहाय्यक शिक्षक | जीवशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| ३०) | प्रा. काळे एस. बी. | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| ३१) | प्रा. लांडगे जी. डी. | सहाय्यक शिक्षक | इंग्रजी | एम्.ए., बी.एड्. |
| ३२) | प्रा. आवारी बी. आर. | सहाय्यक शिक्षक | वाणिज्य | एम्.कॉम., बी.एड्. |
| ३३) | प्रा.श्रीमती घोलप एम. पी. | सहाय्यक शिक्षक | गणित | एम्.एस्सी., बी.एड्. |
| ३४) | प्रा. धीवर ए. एन. | सहाय्यक शिक्षक | वाणिज्य | एम्.कॉम., बी.एड्. |
| ३५) | प्रा. पवार व्ही. के. | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम्.ए., बी.एड्. |
| ३६) | प्रा. विराजदार एस. एस. | सहाय्यक शिक्षक | अर्थशास्त्र | एम्.ए., बी.एड्. |
| ३७) | प्रा. चासकर एस. व्ही. | सहाय्यक शिक्षक | इतिहास | एम्.ए., बी.एड्. |
| ३८) | प्रा. पाडेकर एम. व्ही. | सहाय्यक शिक्षक | मानसशास्त्र | एम्.ए., बी.एड्. |

## क) विना अनुदानित वरिष्ठ प्राध्यापक वृंद

| अ.नं. | नांव | हुद्दा | विषय | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| ०१) | प्रा.सौ. सय्यद महेजबीन | सहाय्यक प्राध्यापिका | वाणिज्य | एम्.कॉम. (नेट) |
| ०२) | प्रा. खताळ बी.पी. | सहाय्यक प्राध्यापक | संरक्षणशास्त्र | एम्.ए. |
| ०३) | प्रा. गाडेकर डी.जी. | सहाय्यक प्राध्यापक | भूगोल | एम्.ए., बी.एड्. |
| ०४) | प्रा. कासार एस.डी. | सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. |
| ०५) | प्रा. घनकुटे एस.जी. | सहाय्यक प्राध्यापक | मराठी | एम्.ए., एम्.फिल (नेट) |
| ०६) | प्रा. मोहटे एस.एस. | सहाय्यक प्राध्यापक | अर्थशास्त्र | एम्.ए., एम्.फिल् |
| ०७) | प्रा. नाईकवाडी पी.एच. | सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र | एम्.एस्सी. |
| ०८) | प्रा. सौ. बंगाळ एस. एम. | सहाय्यक प्राध्यापिका | रसायनशास्त्र | एम्. एस्सी. |
| ०९) | प्रा. वाकुचौरे ए.एल. | सहाय्यक प्राध्यापक | रसायनशास्त्र | एम्.एस्सी. |
| १०) | प्रा. कोटकर एस.बी. | सहाय्यक प्राध्यापिका | भूगोल | एम्.ए. |
| ११) | प्रा. भांगरे व्ही. के. | सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य | एम्.कॉम्. |
| १२) | प्रा. कु. कातोरे के.डी. | सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य | एम्.कॉम्. |
| १३) | प्रा. काळे व्ही.बी. | सहाय्यक प्राध्यापक | मराठी | एम्.ए., पीएच्.डी. |
| १४) | प्रा. फलके एन.बी. | सहाय्यक प्राध्यापक | इतिहास | एम्.ए. |
| १५) | प्रा. कांबळे यु.एन. | सहाय्यक प्राध्यापक | तत्त्वज्ञान | एम्.ए. (नेट) |
| १६) | प्रा. मेढे आर. एस. | सहाय्यक प्राध्यापक | भूगोल | एम्.ए. (नेट) |
| १७) | प्रा. पुंडे जी.एस. | सहाय्यक प्राध्यापक | भूगोल | एम्.ए. |
| १८) | प्रा. वावळे | सहाय्यक प्राध्यापक | भूगोल | एम्. ए. (नेट) |
| १९) | प्रा. कोटकर | सहाय्यक प्राध्यापक | अर्थशास्त्र | एम्. ए. (नेट) |
| २०) | प्रा. शेटे देवदत्त | सहाय्यक प्राध्यापक | वाणिज्य | एम्. कॉम. नेट |

## ड) विना अनुदानित कनिष्ठ प्राध्यापक वृंद

| अ.नं. | नांव | हुद्दा | विषय | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| ०१) | प्रा. आंबरे एस.डी. | सहाय्यक प्राध्यापक | इंग्रजी | एम्.ए., बी.एड्. |
| ०२) | प्रा. कोरडे एस.ई. | सहाय्यक प्राध्यापक | प्राणीशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| ०३) | प्रा. डफाळ एन.बी. | सहाय्यक शिक्षीका | मराठी | एम्.ए., बी.एड्. |
| ०४) | प्रा. रासने आर.एन्. | सहाय्यक शिक्षीका | इंग्रजी | एम्.ए., बी.एड्. |
| ०५) | प्रा. साबळे जी.डी. | सहाय्यक शिक्षक | हिंदी | एम्.ए., बी.एड्. |
| ०६) | प्रा. चौधरी ए.आर. | सहाय्यक शिक्षक | वाणिज्य | एम्.कॉम., बी.एड्. |
| ०७) | प्रा. उगले वाय.जी. | सहाय्यक शिक्षक | क्रीडा | एम्.ए., एम्.एड्. |
| ०८) | प्रा. कानवडे आर. एम्. | सहाय्यक शिक्षक | पर्यावरण | एम्.एस्सी., बी.एड्. |
| ०९) | प्रा. बिबवे एस.जी. | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| १०) | प्रा. जाधव बी. एस. | सहाय्यक शिक्षक | रसायनशास्त्र | एम्.एस्सी., बी.एड्. |
| ११) | प्रा. निमसे व्ही. एन्. | सहाय्यक शिक्षक | वाणिज्य | एम्.कॉम., बी.एड्. |
| १२) | प्रा. डावखर एस.टी. | सहाय्यक शिक्षक | गणित | एम्.एस्सी., बी.एड्. |
| १३) | प्रा. डावरे आर.बी. | सहाय्यक शिक्षिका | हिंदी | एम्.ए., बी.एड्., एम्. फिल. |
| १४) | प्रा. बराते पी.डी. | सहाय्यक शिक्षक | मराठी | एम्.ए., बी.एड्. |

## इ) संगणकशास्त्र व व्यवस्थापन विभाग प्राध्यापक वृंद

| अ.नं. | नांव | हुद्दा | विषय | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| ०१) | प्रा. गुंजाळ के. एस. | विभाग प्रमुख | आय. टी. | एम्.सी.एम्., एम्.सी.ए. |
| ०२) | प्रा. पठाण ए. के. | सहाय्यक प्राध्यापक | आय.टी. | एम्.सी.ए., एम्.बी.ए. |
| ०३) | प्रा. शेळके डी. जी. | सहाय्यक प्राध्यापक | आय.टी. | एम्.कॉम., पी.जी.डी.बी.एम्. एम्.बी.एस्. |
| ०४) | प्रा.सौ. लांडगे आर.एस. | सहाय्यक प्राध्यापिका | आय.टी. | एम्.सी.एम्., एम्.सी.ए. |
| ०५) | प्रा. बुब जी. व्ही. | सहाय्यक प्राध्यापक | आय.टी. | एम्.बी.ए. (नेट) |
| ०६) | प्रा. देशमुख आर. एस. | सहाय्यक प्राध्यापक | आय.टी. | एम्.बी.ए. |
| ०७) | प्रा.कु. खडामकर आर.डी. | सहाय्यक प्राध्यापिका | आय.टी. | एम्.एस्सी. (संगणक शास्त्र) |
| ०८) | प्रा.सौ. थोरात एम. बी. | सहाय्यक प्राध्यापिका | आय.टी. | एम्.कॉम., बी.एड्. |
| ०९) | प्रा. खाटीक डी. आर. | सहाय्यक प्राध्यापक | आय.टी. | एम्.एस्सी. (गणित) |
| १०) | प्रा. ढोकरे जे. जी. | सहाय्यक प्राध्यापक | आय.टी. | एम्.सी.एम्. |
| ११) | प्रा. गावडे एन. एम्. | सहाय्यक प्राध्यापक | आय.टी. | एम्.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) |
| १२) | प्रा.कु. राठी के. एस. | सहाय्यक प्राध्यापिका | आय.टी. | एम्.सी.ए. |
| १३) | प्रा. दिघे आर. डी. | सहाय्यक प्राध्यापक | आय.टी. | एम्.एस्सी. (संगणकशास्त्र) |
| १४) | प्रा.कु. तांबे एम.व्ही | सहाय्यक प्राध्यापिका | आय.टी. | एम्.एस्सी. (संगणकशास्त्र) |
| १५) | प्रा.कु. पांगरकर एस. एस. | सहाय्यक प्राध्यापिका | आय.टी. | एम्.एस्सी. (संगणकशास्त्र) |
| १६) | प्रा. दाईंगडे जे. व्ही. | सहाय्यक प्राध्यापक | आय.टी. | एम्.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) |
| १७) | प्रा.कु. थेटे एस.व्ही. | सहाय्यक प्राध्यापिका | आय.टी. | एम्.एस्सी. (संगणकशास्त्र) |
| १८) | प्रा.कु. वर्पे एस. एल. | सहाय्यक प्राध्यापिका | आय.टी. | एम्.एस्सी. (संगणकशास्त्र) |
| १९) | श्री. वैद्य जी. एन. | प्रयोगशाळा सहाय्यक | आय.टी. | डीप्लोमा आय.टी. |
| २०) | श्री. फापाळे ए. ई. | शिपाई | | |

## ई) प्रशासकीय कर्मचारी

| अ.नं. | नांव | हुद्दा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १) | श्री. ढवळे सी. आर | अधीक्षक | एम्.कॉम. |
| २) | श्री. मंडलिक एम.बी. | वरिष्ठ लिपीक | एम्.ए. |
| ३) | श्री. बोडके एम.डी. | ग्रंथालय लिपीक | बी.ए., बी.लिब. |
| ४) | श्री. बगाड एस.बी. | वरिष्ठ लिपीक | बी.कॉम्. |
| ५) | श्री. साबळे के.एल. | प्रयोगशाळा सहाय्यक | बी.एस्सी., एम्.ए. |
| ६) | श्री. सय्यद एस.बी. | कनिष्ठ लिपीक | एम्.ए. (हिंदी) |
| ७) | श्री. जाधव डी.पी. | प्रयोगशाळा सहाय्यक | बी.एस्सी.एम.ए. |
| ८) | श्री. भालेराव बी.एल. | ग्रंथालय लिपीक | बी.ए.एम्.लिब. |
| ९) | श्री. घुले पी.के. | सहाय्यक ग्रंथपाल | एम्.ए.एम्.लिब.एम्.फिल. |
| १०) | श्री. धुमाळ के.एस. | लिपीक | बी.ए. |
| ११) | श्री. इपकल आर.आर. | कनिष्ठ लिपीक | बी.ए. |
| १२) | श्री. रुपवते डी.बी. | ग्रंथालय परिचर | एस्.एस्.सी. |
| १३) | श्री. अस्वले बी.एच. | ग्रंथालय परिचर | १० वी |
| १४) | श्री. पडवळ एस.टी. | ग्रंथालय परिचर | एम्.ए.एल्.टी.सी. |
| १५) | श्री. छल्लारे एन.जी. | प्रयोगशाळा परिचर | १० वी |
| १६) | श्री. वामन ए.बी. | प्रयोगशाळा परिचर | एम्.ए. |
| १७) | श्री. भांगरे टी.पी. | प्रयोगशाळा परिचर | १० वी |
| १८) | श्री. आरोटे डी.व्ही. | ग्रंथालय परिचर | बी.ए., बी.कॉम्. |
| १९) | श्री. भालेराव के.डी. | प्रयोगशाळा परिचर | बी.ए. |
| २०) | श्री. काठाळे एस.एस. | शिपाई | १० वी |
| २१) | श्री. नाईकवाडी एम.व्ही. | प्रयोगशाळा परिचर | एस्.वाय्.बी.कॉम्. |
| २२) | श्री. कडलग एस.व्ही. | प्रयोगशाळा परिचर | १२ वी |
| २३) | श्री. सावंत बी.एम. | प्रयोगशाळा परिचर | १० वी |
| २४) | श्री. सोनवणे एच.डी. | शिपाई | बी.ए. |
| २५) | श्री. चव्हाण आर.बी. | शिपाई | एम्.ए., बी.एड्. |
| २६) | श्रीमती भुजबळ पी.ई. | शिपाई | बी.ए. |
| २७) | श्री. पथवे एस.के. | शिपाई | बी.ए. |
| २८) | श्री. फटांगरे एस.बी. | ग्रंथालय परिचर | एम्.ए. |
| २९) | श्री. जेडगुले एल.व्ही. | शिपाई | एम्.ए. |
| ३०) | श्री. मेंगाळ बी.बी. | शिपाई | बी.ए. |

2 MAY 2013

# महाविद्यालयीन समित्या

## १) केंद्रीय माहिती अधिकार, अधिनियम २००५

- अधिकाऱ्यांची नावे -

**प्राचार्य रमेशचंद्र खांडगे**
प्राचार्य
अपिलीय अधिकारी

**प्रा. बबनराव महाले**
जनमाहिती अधिकारी

**श्री. चंद्रभान ढवळे**
सहाय्यक जनमाहिती अधिकारी

## २) रॅगिंग प्रतिबंध समिती

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे - अध्यक्ष
डॉ. अविनाश झांबरे - सदस्य
ॲड्. सौ. मंगलाताई हांडे - सदस्या
डॉ. सौ. अकीला शेख - सदस्या
मा. पोलीस निरीक्षक - पदसिद्ध सदस्य
मा.श्री. संपतराव नाईकवाडी - पालक सदस्य
मा.श्री. अमोल वैद्य - पत्रकार सदस्य
विद्यापीठ प्रतिनिधी - पदसिद्ध सदस्य

## ३) महिला अत्याचार प्रतिबंध समिती -

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे - अध्यक्ष
प्रा.डॉ. अशोक दातीर - सदस्य
प्रा.डॉ. सौ. अकीला शेख - सदस्या
प्रा.सौ. रंजना कदम - सदस्या
प्रा.सौ. महेजबीन सय्यद - सदस्या
श्रीमती पुष्पावती भुजबळ - सदस्या


## ४) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी अ.नगर

अनुसूचित जाती विद्यार्थी - विद्यार्थिनींसाठी विषेश मार्गदर्शन (शिष्यवृत्ती) माहिती कक्ष
संपर्क - नोडल अधिकारी
प्रा. साहेबराव गायकवाड
प्रा.डॉ. संपतराव सोनवणे
प्रा. सोपान साळवे
प्रा. राहुल वाघमारे
प्रा.सौ. रंजना कदम


# धन्यवाद !

# अगस्त्य मानांकने


**विद्यापीठ स्तरीय - प्रथम पारितोषिक**
**सन २००६-२००७**




**विद्यापीठ स्तरीय - द्वितीय पारितोषिक**
**सन २००५-२००६**





**जिल्हास्तरीय - प्रथम पारितोषिक**
**सन २००८-२००९**





**जिल्हास्तरीय - तृतीय पारितोषिक**
**सन २००११-२०१२**




**जिल्हास्तरीय - प्रथम पारितोषिक**
**सन २००४-२००५**





स्वातंत्र्यासाठी प्राण देणारी
अनेक माणसे महाराष्ट्राने याआधी
पाहिली आहेत,
समतेच्या वेदीवरही अनेकांनी
प्राणार्पण केले आहे;
पण ज्ञानविज्ञानाच्या महतीसाठी
प्राणाची कुरवंडी ओवाळणारा
नरेंद्र दाभोळकर
हा महाराष्ट्रातील पहिला हुतात्मा
आहे.

– साभार, साप्ताहिक साधना

